
अहम् आवाम्

वर्ष दहावे | अंक ४ | सप्टेंबर २०२२ | पृष्ठे ५२

# वयम्

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

मूल्य
₹ ९०/-






## विनोद

▸ चंगू बदाम खात होता.
मंगू- मलाही टेस्ट करू दे.
चंगू- हा घे एक बदाम.
मंगू- बस एकच?
चंगू- हो. बाकी सगळ्यांची टेस्ट पण अशीच आहे .

▸ पाहुण्यांना ग्रीन टी पाजण्याचे तीन फायदे....
1) ते आपल्याला मॉडर्न समजतात. 2) दुधाचा खर्च वाचतो. 3) ग्रीन टी सोबत बिस्किटं द्यावी लागत नाहीत...

RNI NO.MAHMUL/2013/53138
अहम् आवाम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
# वयम्
वर्ष १० | अंक ४ | सप्टेंबर २०२२
भाद्रपद/आश्विन शके १९४४

# अंतरंग



**संपादकीय** : शुभदा चौकर- ४
**क्लासिक** : धनवंती हर्डीकर- ६
**आनंदाने भरलेली दप्तरं!** : युवराज माने- १२
**कतरीना.. अंहं!!** : अलकनंदा पाध्ये- १६
**शब्दांचं बारसं** : वसुंधरा देवधर- १९
**डॉ. सलील कुलकर्णी यांच्याशी गप्पा**- २०
**कोकणभूल** : विद्याधर शुक्ल- २३
**गोलमगोल** : राजीव तांबे- २४
**Hide & Seek** : Juilee Mahimkar- २६
**माझे वाक्प्रचार** : बालाजी इंगळे- २८
**Super Grandma :** Prachi Mokashi-३०
**माझे किशोरवय** : प्रणव सखदेव- ३४
**छोटा शेफ** : वैशाली खाडिलकर- ३७
**मैत्र** : कांचन जोशी- ३८
**कल्पककला** : स्वरूपा वक्नाली- ३९
**वासांचा मेमरीबॉक्स** : देवयानी खरे- ४०
**निसर्गातले घर रचनाकार** : मकरंद जोशी- ४२
**त्यांनाही वाटत असेल** : प्रवीण दवणे- ४५
**असे का होते?- जांभई** : डॉ. उज्ज्वला दळवी- ४६
**शब्दखेळ** : कांचन जोशी- ४८
**एकदा ढगांनी घेतली सुट्टी** : वैशाली सूर्यवंशी- ४९





**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
अच्युत गोडबोले
राजीव तांबे
श्रीकांत वाड

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

**मुखपृष्ठ**
भाग्यश्री पटवर्धन

**सुलेखन**
अच्युत पालव

**अंकातील चित्रे**
गिरीश सहस्रबुद्धे, अदिती पाध्ये-देसाई, जुईली माहीमकर, आर्चिस टिळवे

**वरिष्ठ उपसंपादक**
क्रांती गोडबोले-पाटील

**मांडणी-सजावट**
क्रांती गोडबोले-पाटील

**मुद्रितशोधन**
शिवानी ओक

**वितरण व्यवस्था**
राजेंद्र गोसावी

'वयम्' हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी मेसर्स रेड एलिफंट, ३१५/ए १, शाह ॲण्ड नाहर इंड. इस्टेट, ३रा मजला, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले.
या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम्', न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
इमेल : info@wayam.in
www.wayam.in

**'वयम्' आता डिजिटल रूपातसुद्धा!**

**bahuvidh.com हे साहित्यदालन आहे. त्यावर 'वयम्'ला क्लिक करा आणि 'वयम्'चे ऑनलाइन सभासदत्व घ्या. सभासद झालेल्यांना 'वयम्'चे साहित्य कॉम्प्युटरवर किंवा स्मार्टफोनवर वाचता येईल.**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्' वाचकांनो, दर महिन्याला २० तारखेपर्यंत तुम्हांला अंक पोहोचला नाही तर 'वयम्'च्या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संपर्क साधावा, ही विनंती. **-संपादकीय आणि वितरण विभाग**

# संपादकीय



# चंद्राची आगळी कला!

**‘वयम्’ दोस्तांनो,**

अलीकडेच आपण गणपती-उत्सव साजरा केला. दर गणेशचतुर्थीला मला माझ्या लहानपणच्या एका गोष्टीची आठवण होते. आम्हांला सांगितलं जायचं, की या दिवशी चंद्राकडे पाहायचं नाही हं! का, तर म्हणे गणपतीबाप्पा रागावेल. त्याचा हुकूम आहे तसा. लहानग्या गणपतीची एक कहाणी आम्हांला सांगितली जायची. हत्तीएवढ्या तोंडाचा, तुंदिलतनु (गुटगुटीत) गणपती त्याच्या लहानग्या उंदीर-वाहनावरून हलत, डुलत, स्वतःला तोलत चालला होता. हे चित्र बघून म्हणे चंद्राला हसू आवरेना. साहजिकच आहे ना! चंद्र त्याला हसतोय हे बघून गणपती रागावला. त्याने चंद्राला शाप दिला की, तू सुंदर आहेस, याचा तुला फार गर्व आहे. यापुढे या पृथ्वीतलावरचं कोणी तुझं तोंडही बघणार नाही! चंद्र हिरमुसला, घाबरला. मग त्याने शंकरदेवांना पटवून गणपतीला समजवायला सांगितलं. नंतर गणपतीने हा शाप कमी केला, निदान गणेश-चतुर्थीला तरी तुझं तोंड कोणी बघणार नाही, अशी एक दिवसाची शिक्षा दिली. अशी ही गोष्ट... देवांना, ग्रह-उपग्रहांना मानवी गुण चिकटवून आपल्याला त्यांच्याशी जवळीक वाटायला लावेल अशी ही काल्पनिक गोष्ट! अगदी लहानपणी हे खरं वाटायचं, नंतर विसरूनही गेले होते ही गोष्ट.

मध्यंतरी मी स्वीडन देशात होते. तेव्हा तिथे आगळा-वेगळा चंद्र बघताना अचानक या गोष्टीची आठवण झाली. हा देश उत्तर ध्रुवाजवळचा. जुलै, ऑगस्ट महिन्यात इथे समर म्हणजे उन्हाळा असतो. या मोसमात सूर्य खूप जास्त वेळ काम करतो, त्यामुळे चंद्र फार वेळ आकाशात दिसायचा नाही. रात्री साडेअकराला जरा कुठे अंधारू लागायचं. उजेड कमी होताच आकाशात चंद्र हजर व्हायचा. या दोन-तीन महिन्यांत इथे चंद्र जेमतेम तीन तास लख्ख, प्रकाशित दिसतो. नंतर लगेच सूर्य अवतरतो. अडीच ते तीन वाजताच पहाटेचे रंग आकाशात दिसू लागतात. मग चंद्र पांढूरका, निस्तेज होऊन जातो.

इथे आम्ही रात्र होण्याची वाट बघायचो, कारण त्याशिवाय झोपावंसं वाटायचं नाही. एकदा संध्याकाळी फिरून येत असताना आकाशात काळोख होताच कौतुकाने चंद्राकडे बघितलं आणि चमकलेच. चंद्रकोर उभी होती. एकदम शिस्तीत ताठ उभा असलेला चंद्र! त्याचा इंग्लिश D आकार! जरा डोकं खाजवल्यावर लक्षात आलं, की एरवी भारतात म्हणजे आपण विषुववृत्ताच्याजवळ राहतो.



चंद्र स्वतःभोवती गिरक्या घेत, पृथ्वीभोवती फिरतो तो आडव्या अक्षात. म्हणून आपल्याला करंजीसारखी आडवी चंद्रकोर दिसते. कारण आपण एका सरळ रेषेत चंद्राकडे बघतो. पण स्वीडनमधून म्हणजे उत्तर ध्रुवाजवळच्या कोणत्याही देशातून आपण चंद्राकडे वरून खाली बघतो. त्यामुळे तो उभा दिसतो आणि चंद्राकडे बघण्यासाठी नजर फार वर करावी लागत नाही. समोरच्या बाजूला असल्यासारखा वाटतो तो.

ही गंमत काही मित्र-मैत्रिणींना सांगितली तर मधुबाला चिंचाळकर या मैत्रिणीने दक्षिण गोलार्धातून, अंटार्क्टिकातून दिसणाऱ्या चंद्राचे फोटो पाठवले. मला दिसला, त्याच्या बरोब्बर उलटा चंद्र त्यांना दिसला होता! उलटा D- म्हणजे आधी अर्धगोल आणि मग दांडी! परत डोक्याला ताण दिला आणि लक्षात आलं, अंटार्क्टिका म्हणजे पृथ्वीचं दक्षिणेचं टोक. तिथून चांदोबाकडे बघायचं, म्हणजे आपण खालती, चंद्र वरती. ('वयम्'च्या जुन्या वाचकांनी डॉ. मधुबाला चिंचाळकर यांची अंटार्क्टिकावरची मालिका वाचली असेल. भारताच्या अंटार्क्टिका मोहिमेत त्या सामील झाल्या होत्या.)

लहानपणापासून आपण ज्याची गाणी आवडीने म्हणतो, त्या आपल्या लाडक्या चंद्राच्या कला आगळ्या आणि चंद्रकोरीही वेगळ्या!

चंद्राच्या इतक्या वेगवेगळ्या कला असल्याने त्याच्या सौंदर्याबद्दल, कलेचा देव असलेल्या गणपतीलाही हेवा वाटला असेल का?

**-शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*


## दिवाळी अंकाविषयी

**आता पुढचा अंक हा 'दिवाळी अंक'- ऑक्टोबर-नोव्हेंबर जोड-अंक असेल. त्यामुळे तो १ तारखेऐवजी थोडा उशिरा प्रसिद्ध होईल. दिवाळीच्या आधीच तुम्हांला अंक मिळेल. तुमच्या मित्र-मैत्रिणींना, भावंडांना तो अंक भेट द्यायचा असेल तर 'वयम्' ऑफिसला फोन करून नोंदणी करून ठेवा हं. आपल्या अंकाच्या प्रती काही वेळा लवकर संपतात! दरवर्षीप्रमाणे यंदाचा दिवाळी अंकही अधिकाधिक दर्जेदार करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. आपला दिवाळी अंक तुम्हा मुलांच्या बरोबरीने तुमचे पालक व आजी-आजोबाही आवडीने वाचतात, हे सगळ्यांना माहीत आहेच. या अंकात काय काय आहे, ते लवकरच आपल्या वेबसाइटवरून आणि सोशल मिडियावरून कळेलच.**

क्लासिक

# कँटरव्हील भुताची कर्मकहाणी

**आॅस्कर वाइल्ड हे एकोणिसाव्या शतकातील सुप्रसिद्ध लेखक, कवी, नाटककार. त्यांची मिस्किल, विनोदी, उपहासात्मक लेखनशैली आजही लोकप्रिय आहे. त्यांच्या 'द कँटरव्हील घोस्ट' या दीर्घकथेच्या एका भागाचा हा संक्षिप्त आणि स्वैर अनुवाद.**



**श्री.** हायरम बी ओटिस या अमेरिकन गृहस्थांनी इंग्लंडमध्ये आल्यावर कँटरव्हील प्रासाद विकत घेतला, तेव्हा त्यांना सगळ्यांनी सांगितले होते, की असा वेडेपणा करू नका. त्या जागेत भुताटकी आहे. बाकीच्यांचे राहू दे, ती जागा विकताना जागेचे मालक लॉर्ड कँटरव्हील यांना स्वतःलासुद्धा ते सांगितल्याशिवाय राहवले नाही. "आम्ही तिथे राहायचे सोडून दिले होते. आमच्या कुटुंबातल्या वयस्कर लोकांनी ते भूत पूर्वी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलं आहे. माझ्या मावसआजी म्हणजे डचेस ऑफ बोल्टन एकदा आरशासमोर उभ्या राहून डिनरला जायची तयारी करत होत्या, तेव्हा अचानक त्यांना आपल्या खांद्यावर हाडाच्या सापळ्याचे दोन हात दिसले! त्या फीट येऊन पडल्या आणि त्या धक्क्यातून कधी सावरल्याच नाहीत. ते रात्री बेरात्री येणारे गूढ आवाज- कसं राहणार तिथे! नोकरही मिळेनात कामाला! आणखी एक, आता तीनशे वर्षं झाली. आमच्या घरात एखादा मृत्यू होणार असेल ना, तर आदल्या दिवशी हमखास ते भूत भेट देतं."

"तसं तर काय, कोणी मरायच्या आदल्या दिवशी फॅमिली डॉक्टर पण हमखास भेट देतात," ओटिस महोदय म्हणाले. प्रासाद विकत घेण्याचा त्यांचा

निर्णय पक्का होता.

त्यानंतर थोड्याच दिवसांनी ओटिस फॅमिली कँटरव्हील प्रासादात राहायला आली. मिसेस ओटिस या दिसायला सुरेख अशा उत्साही, मध्यमवयीन, ठणठणीत प्रकृतीच्या बाई होत्या. त्यांचा सर्वात मोठा मुलगा वॉशिंग्टन. देखणा, तरतरीत, नृत्यकलेत पारंगत आणि अतिशय व्यवहारी. त्याच्यानंतरची व्हर्जिनिया ही पंधरासोळा वर्षांची, निळ्या डोळ्यांची गोड मुलगी. तिच्यानंतरचे दोघे जुळे भाऊ. चपळ आणि मस्तीखोर, आधुनिक आणि लोकशाही विचारांचे.

तर ही सगळी मंडळी मोठ्या उत्साहात कँटरव्हील प्रासादाकडे निघाली. जुलै महिन्यातील प्रसन्न संध्याकाळ. हवेत पाइन वृक्षांचा मंद सुवास पसरलेला. कडेच्या दाट हिरव्या वनराईत मध्येच उडणारे रंगीत पक्षी, कुठे टुकुटुकू बघणाऱ्या खारी, कुठे झाडीत लपणारे ससे- वाटेत सगळे कसे अगदी आल्हाददायक होते. पण त्यांनी कँटरव्हील प्रासादाच्या क्षेत्रात प्रवेश केल्यावर मात्र अचानक आकाशात काळे ढग भरून आले. वातावरणात एक विचित्र शांतता जाणवू लागली. मोठ्या काळ्या पक्ष्यांचा एक थवा अचानक आकाशात झेपावला.

ओटिस मंडळींच्या स्वागतासाठी म्हाताऱ्या हाऊसकीपर बाई काळा रेशमी पोशाख आणि पांढरा एप्रन, कॅप घालून उभ्या होत्या. त्यांच्यापाठोपाठ मंडळी आत गेली. जुन्या पद्धतीचे पण भक्कम बांधकाम. आत गेल्यावर एका बाजूला काहीशी अंधारी, रंगीत काचांची भलीमोठी खिडकी असणारी लायब्ररी होती. तिथेच त्यांच्या चहापाण्याची व्यवस्था केलेली होती.

"इथे काहीतरी सांडलंय वाटतं," जमिनीवरचा लाल डाग पाहून मिसेस ओटिस, म्हणाल्या.

"होय, बाईसाहेब, या जागी रक्त सांडलंय!" म्हातारबाईंनी हलकेच गूढ आवाजात सांगितले.



"शी! शी! पुसून टाकायला पाहिजे ते लगेच!" ओटिस बाईसाहेब उद्गारल्या.

हाऊसकीपर बाईंनी एक स्मित केले. "लेडी एलिनॉर डि कँटरव्हील यांचं रक्त आहे ते! अगदी याच जागी त्यांचे पती सर सायमन डि कँटरव्हील यांनी त्यांचा खून केला. नंतर नऊ वर्षांनी तेही अचानक गायब झाले. त्यांचं मृत शरीर काही सापडलं नाही, पण त्यांचा अपराधी आत्मा आजही हिंडत असतो प्रासादात! हा डाग बघायला मुद्दाम येतात लोक. न पुसता येणारा डाग आहे तो."

"न पुसता यायला काय झालं!" वॉशिंग्टन म्हणाला. "पिंकरटन यांचे चॅम्पियन स्टेन रिमूव्हर अर्थात पॅरागॉन डिटर्जंट वापरा, लगेच जातो डाग! हे पाहा!" म्हाताऱ्या हाऊसकीपर बाईंना काही कळायच्या आत त्याने गुडघ्यावर बसून लगेच एका

काळ्या कांडीने फरशी घासायला सुरवात केली. काही क्षणातच डाग दिसेनासा झाला.

"बघा, मी म्हटलं ना, पिंकरटनने काम होणार!" तो विजयी स्वरात म्हणाला. तेव्हढ्यात विजेचा कडकडाट झाला आणि म्हातारबाईंना भोवळ आली.

"आता या चक्कर येऊन पडणाऱ्या आजींना कामावर कसं बाई ठेवायचं!" ओटिस बाईसाहेबांना काळजी वाटू लागली.

"वस्तूंची मोडतोड झाली की पैसे कापतो, तसेच प्रत्येक वेळी चक्कर आली की पैसे कापा, मग नाही येणार चक्कर." हायरम यांनी उपाय सुचवला.

क्षणातच आजीबाई भानावर आल्या. त्या बऱ्याच अस्वस्थ होत्या. त्यांची समजूत काढून आणि शिवाय पगार वाढवण्याचे कबूल करून ओटिस मंडळींनी त्यांची रवानगी केली.

रात्री वादळाचा जोर कायम होता, पण बाकी विशेष काही घडलं नाही. सकाळी सगळे ब्रेकफास्टकरता जमले, तेव्हा फरशीवर कालचा तो भयानक डाग पुन्हा त्याच जागी दिसला.

"हा काही पॅरागॉन डिटर्जंटचा दोष वाटत नाही, मी ते खूपदा वापरलंय. हे बहुतेक खरंच भुताचं काम दिसतंय." वॉशिंग्टन म्हणाला. त्याने पुन्हा एकदा तो डाग पुसून काढला. दुसऱ्या दिवशी पुन्हा तिथेच, तोच डाग! तिसऱ्या दिवशी तर हायरम यांनी स्वतः त्या खोलीला कुलूप घातले, तरी डाग आलाच! सगळ्यांना कुतूहल वाटायला लागलं. खरोखरच इथे भूत आहे की काय!

दिवसभरातील गप्पाटप्पांत भुताचा विषय निघाला नाही, पण रात्री निजानीज झाल्यावर श्रीयुत ओटिस यांना त्यांच्या खोलीबाहेर विचित्र आवाज ऐकू आले. बेड्या-साखळदंड किचकिच वाजावेत असे. त्यापाठोपाठ पावलांचा आवाज. कोणीतरी जवळ जवळ येत होते. श्रीयुत ओटिस यांनी शांतपणे आधी स्वतःला ताप आलेला नाही ना, ते पाहिले.



मग नाडीचे ठोके तपासले. सगळे काही ठीकठाक होते. मग त्यांनी आपल्या पेटीतून काचेची एक छोटी बाटली काढली आणि खोलीचे दार उघडले. समोर फिकट चांदण्यात एक भयानक चेहऱ्याचा वृद्ध माणूस उभा होता. लाल निखाऱ्यासारखे डोळे, पांढऱ्या केसांच्या लांबलचक जटा, अंगावर मळक्या चिंध्या, आणि हातापायात ठोकलेल्या जडच्या जड बेड्या आणि साखळदंड!!

"या तुमच्या दंडबेड्यांना वंगणतेल घातलंच पाहिजे बरं का." श्रीयुत ओटिस म्हणाले, "ही घ्या टॅमनी रायझिंग सन वंगणतेलाची बाटली. एकदा घातलं की काम फत्ते ! बऱ्याच जणांना फार चांगला अनुभव आलाय. इथे मेणबत्त्यांच्या शेजारी बाटली ठेवतो. आणखी लागलं, तरी विनासंकोच सांगा!" इतके बोलून आणि दाराबाहेरच्या टेबलावर बाटली ठेवून त्यांनी खोलीचे दार लावून घेतले.

कँटरव्हील भुताचा नुसता संताप संताप झाला. फरशीवर खळ्ळकन आपटून त्याने ती बाटली फोडून टाकली. घशातून विचित्र आवाज काढत आणि अंगातून हिडीस हिरवा प्रकाश फेकत ते निघाले. एव्हढ्यात आणखी एक दार उघडले, पांढरे कपडे घातलेल्या दोन छोट्या आकृत्या बाहेर आल्या, आणि त्याच्या दिशेने त्यांनी फेकलेली उशी भिरभिरत आली! पण विचार करत बसायला वेळ नव्हता. भूत ताबडतोब चौथ्या मितीचा आधार घेऊन भिंतीत शिरले आणि तिथून नाहीसे झाले. घरात पुन्हा शांतता पसरली.

प्रासादाच्या डाव्या भागातील त्याच्या एका गुप्त खोलीत पोचल्यावर चंद्रकिरणाला टेकून भुताने जरा दम घेतला. त्याच्या तीनशे वर्षांच्या अखंड देदीप्यमान कारकिर्दीत त्याचा एव्हढा घाणेरडा अपमान कोणी केला नव्हता. त्याने पूर्वी एकदा नुसते पडद्यातून दात विचकले होते, तरी चार मोलकरणी बेशुद्ध पडल्या होत्या. खुर्चीत बसून एक सापळा आपली डायरी वाचतोय हे पाहिल्यावर तर एक सरदारीण बाई दीड महिना आजारी होत्या. काचेवर टकटक करणारा हिरवा हात पाहून एका बटलरने स्वतःवर गोळी झाडून घेतली होती. लॉन टेनिसच्या मैदानावर भुताची हाडे एकापाठोपाठ एक खाली कोसळताना पाहून झालेला हलकल्लोळ तर केवळ अवर्णनीय होता. आजवर घेतलेली तऱ्हेतऱ्हेची रूपे आठवून त्याने एक कडवट हास्य केले. 'आले मोठे अमेरिकन वंगणतेलाची बाटली देणारे आणि उशा फेकून मारणारे! बघून घेईन!!' रात्रभर भूत सूडाचाच विचार करत राहिले.

भुताने फोडून टाकलेली बाटली पाहून हायरम ओटिसना जरा वाईट वाटले, पण तरीदेखील भुताला उशी फेकून मारणे योग्य नाही असे त्यांनी जुळ्यांना बजावले. त्यानंतर एक आठवडा शांततेत गेला. लायब्ररीच्या फरशीवर रोज पुन्हा त्याच जागी डाग मात्र दिसायचा. कधी लाल, कधी केशरी, जांभळा, निळा, एकदा तर चक्क गडद हिरवा! आता उद्या कोणता रंग दिसणार, यावर ओटिस मंडळी पैज लावू लागली.

रविवारी रात्री भुताने दुसऱ्यांदा दर्शन दिले. तळमजल्यावरच्या हॉलमध्ये मोठा आवाज झाल्याने सगळेजण झोपेतून खडबडून जागे झाले आणि तिकडे धावले. तिथे भिंतीवरचे चिलखत आणि शिरस्त्राण खाली जमिनीवर पडले होते, आणि भूत मोठ्या खुर्चीवर बसून गुडघे चोळत होते. त्याला पाहिल्यावर लगेच जुळ्यांनी खेळातील बंदुकीतून त्याच्यावर छर्रे मारले. श्रीयुत ओटिस हे तर खरी बंदूक रोखूनच आले होते, 'हात वर!' त्यांनी फर्मावले! एक किंकाळी फोडून भुताने धुक्याचे स्वरूप घेतले आणि ते वाऱ्यासारखे त्यांच्यामधून पलीकडे वर झोपण्याच्या खोल्यांकडे झेपावले. तिथे उभे राहून त्याने त्याचे ते अंगाला कापरे भरवणारे सुप्रसिद्ध विकट हास्य केले. प्रासादाच्या घुमटात त्याचे प्रतिध्वनी उमटून विरतात न विरतात, तोच फिकट निळा ड्रेसिंग गाऊन घातलेल्या ओटिस बाईसाहेब आपल्या खोलीचे दार उघडून बाहेर आल्या. "तुमची तब्येत पारच बिघडलेली दिसते हो. ही डॉक्टर डोबेल यांच्या टिंक्चरची बाटली म्हणूनच



आणली तुमच्यासाठी. विशेषतः जर अपचनाचा त्रास असेल ना, तर त्यावर फार उपयोगी आहे हे.” त्या म्हणाल्या. भुताने त्यांच्याकडे जळजळीत नजरेने पाहिले. आता ते काळ्या दांडग्या कुत्र्याचे रूप घेणार तितक्यात त्याला मागून पावलांचा आवाज आला. नाइलाजाने आपला कुटील हेतू बाजूला ठेवत ते निघून गेले.

स्वतःच्या गुप्त खोलीत पोचल्यावर मात्र भुताच्या संयमाचा बांध फुटला. ती व्रात्य जुळी पोरे, त्यांची ती उपयुक्ततावादी आई यांचा तर त्याला संताप आलाच होता, पण सगळ्यात वाईट म्हणजे आज या अस्वस्थ मनःस्थितीत स्थितीत मुळात त्याला चिलखत घालायलाच जमले नव्हते.

त्या प्रसंगानंतर भुताला आजारपणच आले. काही दिवस स्वतःची नीट काळजी घेऊन ते हळूहळू बरे झाले. मग मात्र ओटिस कुटुंबाला घाबरवून सोडण्यासाठी तिसरी चढाई कशी करायची याची त्याने अगदी नीट आखणी केली. त्याच्या कपडेपटातल्या गोष्टी बराच वेळ निरखून त्याने एक खास वेश निवडला- लाल पीस लावलेली आणि अर्धा चेहरा झाकणारी भलीमोठी हॅट, गळा आणि मनगटाजवळ झालर असलेले, प्रेतावर घालतात तसे लांबरुंद पांढरे कापड आणि हातात गंजकी कट्यार!

प्रत्यक्ष त्या रात्री सुदैवाने हवाही एकदम वादळी होती. प्रासादाची दारेखिडक्या खडखड वाजत होती. आता पिंकरटन यांचे पॅरागॉन डिटर्जंट वापरून रोज रक्ताचा डाग साफ करणाऱ्या फाजील वॉशिंग्टनच्या खोलीत सगळ्यात आधी जायचे, त्याला उठवून, मंद्र संगीताच्या पार्श्वभूमीवर त्याच्यासमोर तीनदा गळ्यात कट्यार खुपसून घ्यायची, मग ओटिस महाशय आणि त्यांच्या पत्नीला घाबरवायचे, व्हर्जिनियाला काही फार त्रास द्यायचे कारण नव्हते, पण त्या जुळ्यांना मात्र हिरवे प्रेत, पांढरी हाडे, गरगर फिरणारा एकच डोळा असे सगळे दाखवून



चांगली अद्दल घडवायची! मध्यरात्रीच्या किर्र अंधारात कट्यार फिरवत भूत मोहिमेवर निघाले. सोसाट्याचा वारा सुटला होता. भुताचे केस आणि कापड चित्रविचित्र आकारात उडत होते. सूडाची घटका अगदी जवळ आली होती, भूत वॉशिंग्टनच्या खोलीत जायला वळले, तोच...

भुताने घाबरून एक किंकाळी फोडली आणि धडपडत मागे जात आपल्या अस्थिपंजर हाताने आपला चेहरा झाकून घेतला. त्याच्यासमोर एक भेसूर गूढ आकृती स्तब्ध उभी होती. पांढराफटक गोल चेहरा, त्यावर पसरलेले विद्रूप विकट हास्य, लाल प्रकाश फेकणारे डोळे, आग ओकणारे तोंड, हिडीस पोशाख, छातीवर बरीच काहीतरी विचित्र अक्षरे, चिन्हे, आणि उजव्या हातात रुंद पात्याची तळपती तलवार! दुसरे भूत! कँटरव्हील भुताने त्यापूर्वी कधीच भूत पाहिले नव्हते. साहजिकच

त्याची भीतीने गाळण उडाली आणि त्याने आपल्या खोलीत पळ काढला.

थोड्या वेळाने मात्र भुताचा खानदानी अभिमान उसळून आला. पुन्हा त्या जागी जाऊन या प्रकाराचा छडा लावायचा, जमलेच तर नव्या भुताशी हातमिळवणीही करायची असे त्याने ठरवले. पण तिथे पाहतो तो काय, दुसऱ्या भुताचे डोके, कपडे, तलवार इतस्ततः पडले होते. त्यात आता काही प्रकाशबिकाश नव्हता, नुसता आतून पोखरलेला सलगमचा गोल गड्डा, पांढरी चादर आणि स्वयंपाकघरातली मोठी सुरी! ती विचित्र अक्षरे त्याने नीट जवळून वाचली.

*हे ओटिस भुता, अस्सल आणि एकमेव मृतात्म्या, नकलेपासून सावध रहा! तूच खरा, बाकी सगळे खोटे!*

आपण फसलो, गंडवले गेलो, मुलांनी पुन्हा आपल्यावर मात केली हे भुताला कळून चुकले. भुताला आता फारच थकवा, अशक्तपणा वाटू लागला. रोज रोज रक्ताचा डाग पाडायचेही त्याने सोडून दिले. आता कर्तव्याचा भाग म्हणून आठवड्यातून एकदा ते रात्रीचे हिंडत असे, पण सावधपणे, आवाज न करता ! आवाज होऊ नये म्हणून त्याने चक्क ते वंगणतेलसुद्धा वापरायला सुरुवात केली.

इतकी सावधगिरी बाळगूनदेखील धोका टळला नाहीच. जुळ्यांनी कधी त्याच्या वाटेत दोऱ्या बांधलेल्या असत, तर कधी फरशीला लोणी फासून ठेवलेले असे. अखेर आपली इज्जत, इभ्रत, सामाजिक प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी भुताने एक शेवटचा प्रयत्न करायचे ठरवले. शिर नसलेले फक्त धड हे ‘रांगडा रुपर्ट’ नावाचे त्याचे भयंकर रूप म्हणजे भुताचा हुकमी एक्का होता. सत्तर वर्षांपूर्वी त्याने ते रूप घेतले होते. मोठ्या कष्टाचे काम होते ते. तीन तास तयारी करावी लागे. शिर नसले तरी शिकारी बूट, पिस्तुले वगैरे बाकीचा जामानिमा करून भूत सज्ज झाले. प्रासादाच्या लांब कोरिडॉरमधून तरंगत ते आधी जुळ्यांच्या खोलीजवळ पोचले. खोलीचे दार किंचित उघडेच होते, ते त्याने ऐटीत फाडकन उघडले. त्याच क्षणी पाणी भरलेला जग त्याच्या अंगावर उपडा झाला आणि जुळ्यांच्या पलंगावरून त्याला खिदळण्याचे दबके आवाज ऐकू आले. तो जग डोक्यातच पडला असता, पण सुदैवाने डोके बरोबर आणलेलेच नव्हते. त्यामुळे फक्त कपडेबूट चिंब भिजण्यावर निभावले.

ओटिस कुटुंबाला घाबरवता येईल ही आशा भुताने आता सोडून दिली. ते आता रात्रीच्या वेळी गळ्याला मफलर गुंडाळून हळूच एखादा फेरफटका मारून येई. एकदा असेच रात्री लायब्ररीकडे जात असताना अचानक दोन्ही बाजूंनी उंच केलेले हात हलवत दोन आकृत्या त्याच्या अंगावर आल्या आणि त्याच्या कानात ‘भॉक्’ करून ओरडल्या. भूत वेगाने परत जिन्याकडे वळले, तर तिथे पाण्याची मोठी पिचकारी धरून वॉशिंग्टन उभा होता. कोंडीत सापडलेले भूत शेवटी तिथल्या शेगडीत शिरले - ती पेटवलेली नव्हती ते एक बरे - आणि धुराड्यातून वाट काढत कसेबसे स्वतःच्या खोलीत पोचले.

त्यानंतरही मुलांनी भुतासाठी बऱ्याच वेळा सापळे रचले, पण भूत पुन्हा तिकडे फिरकले नाही. ते आता कायमचे गेले असे ओटिस मंडळींना वाटले, पण ती त्यांची गैरसमजूत होती. आजारी, निराश अवस्थेत ते एकटेच त्याच्या खोलीत राही. पुढे व्हर्जिनियाशी त्याची भेट कशी झाली, तिने त्याला मदत कशी केली आणि त्याला मुक्ती कशी मिळाली ही एक वेगळी आणि गंभीर गोष्ट आहे. ती पुन्हा कधीतरी.


**–धनवंती हर्डीकर**

*dhanavanti@gmail.com*

*(शिक्षणतज्ज्ञ)*


*(कथेतील चित्रं इंटरनेटवरून साभार)*






**ऊस लागवड क्षेत्रातील गावातल्या एका शाळेत या तरुण शिक्षकाने शिक्षणाचा मळा फुलवला आहे. ५ सप्टेंबर, शिक्षकदिनानिमित्त या आनंदी शिक्षकाचं हे मनोगत–**

**गुरुजी** म्हणून सेवेत आल्यापासून मी माझ्या मनात शाळेविषयीचं एक स्वप्न बाळगलं- जिथे मुलांना स्वतःहून यावंसं वाटेल, शिकावंसं वाटेल, इतरांनाही तो आनंद सांगावासा वाटेल, शाळेत येणारं प्रत्येक मूल रोज काहीना काही आनंद घेऊन जाईल व आपल्या अनुभवांच्या 'दप्तरात' तो जमा करत जाईल, प्रत्येक मूल विचार करू लागेल, त्यांच्या मनातल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर सर्वजण मिळून शोधतील, जिथे चुकणाऱ्याला शिक्षा नसेल, शाळेतला एखादा विद्यार्थी आजारी असेल तर प्रत्येक जण जाऊन त्याला भेटेल, प्रत्येक मूल कोणत्याही विषयावर व्यक्त होईल असं वातावरण असेल, मुलांच्या परस्पर नात्याचे सुंदर धागे विणले जातील, वाचनाचा आनंदसोहळा त्यांना अनुभवायला मिळेल. पहा, करा, भेटा, वाचा, शोधा, बोला अशी पद्धती शिक्षणात असेल...

गुरुजी म्हणून पहिल्यांदा गोंदिया या वनवासी, नक्षलग्रस्त भागात हे स्वप्न साकार करण्याचे प्रयत्न सुरू झाले. तिथे जंगलात मनसोक्त फिरणाऱ्या लेकरांना शाळा म्हणजे तुरुंग वाटायचा. त्यामुळे ती शाळेपासून दूर पळायची. त्यांना शाळेत आणणं हे एक आव्हान होतं. शाळेपासून दूर पळणाऱ्या लेकरांच्या आवडीनिवडी कोणत्या, ते नेमकं जंगलात काय करतात, ते शाळेत का येत नाहीत, याविषयी काही लेकरांकडून जाणून घेतलं. शाळेत गोंडी, पोवारी व हिंदी भाषा बोलणारी मुलं होती. मग शिल्पा, वर्षा, जितू हे माझे विद्यार्थीच माझे भाषिक गुरू झाले. त्यांच्याकडून दैनंदिन व्यवहारात वापरले जाणारे शब्द शिकून घेतले. खुल्या आकाशाखाली झाडाझुडपात, पशू-पक्ष्यांसोबत स्वतंत्रपणे स्वैर फिरणारी ही लेकरं शाळेच्या चार भिंतीत कशी बसतील? कोंदट वाटायचं त्यांना. त्यामुळे वर्गात कमी आणि मैदानावर जास्त, असा मार्ग अवलंबला. सुरुवातीला प्रार्थना, गीतं व



युवराज मानेसर अनुभव शिक्षणाचे धडे देताना

कथांचा समावेश केला. दुपारी जेवणाच्या सुट्टीनंतर वडाच्या झाडाखाली 'वाचनाचा आनंदसोहळा' भरू लागला. वेगवेगळया मासिकांतील, पुस्तकांतील, वर्तमानपत्रांतील मुलांच्या भावविश्वाशी अनुसरून असलेल्या बातम्या, कथा, कविता, संवाद लेकरांना वाचून दाखवू लागलो. त्यावर चर्चा होऊ लागली. सुरुवातीला आठ-दहाच लेकरं येऊन बसत होती. जसजसा वाचनाचा सुगंध दरवळू लागला, तसतशी अधिक लेकरं येऊ लागली.

या वाचनाच्या आनंदसोहळयात काही लेखक माझ्या लेकरांशी संवाद साधू लागले. सुरुवात झाली ती डॉ. आ. ह. साळुंखे व प्रवीण दवणे सरांपासून. या दोन्ही शब्दप्रभूंनी आमच्या लेकरांवर एक अमूल्य संस्कार केला, तो म्हणजे 'कृतज्ञता' ! या दोघांच्या कथा मुलांना खूप आवडल्या. त्यामुळे त्यांना आमच्या लेकरांनी पत्र लिहिलं. लेकरांच्या पत्रांना उत्तरं देताना त्यात त्यांनी लेकरांना सांगितलं, "बाळांनो, ज्यांनी तुम्हांला ज्ञान दिलं, आनंद दिला त्यांच्याविषयी कृतज्ञता बाळगा, कृतज्ञता हा मोठा संस्कार आहे." यातूनच पत्रमैत्री, पेनमित्र, शिदोरी, अमृतकण हे विविध उपक्रम सुरू केले. या उपक्रमांच्या माध्यमातून माझी लेकरं अनेक यशस्वी व कर्तबगार मान्यवरांशी संवाद साधू लागली.

शिक्षणाच्या आनंददायी प्रवासात अनेक असे विद्यार्थी भेटले, ज्यांनी माझ्या मनाचा तळ ढवळून काढला. पाच किमी अंतरावरून मासे विकत विकत मग शाळेत येणारी शिल्पा, चार भावंडांचा सांभाळ करत अभ्यास करत वर्गात प्रथम असणारी गोकर्णा, घरात आजारी आई-वडिलांची सेवा करून शाळेत सर्व उपक्रमांत चमकणारी वर्षा, अपंगत्वावर मात करणारी अजित व मोनी यांची जोडी, आईवडिलांचं छत्र नसलेलं गुणी लेकरू जितू, शाळेतील सर्वांशी प्रेमाने वागणारी मेघा, प्रत्येक गोष्टीत माझ्याशी वाद घालणारी नेहा, "गुरुजी, तू मला आवडला" असं उभी राहून निःसंकोचपणे सांगणारी चिमुरडी ममता, मी दोन दिवसांच्या सुट्टीनंतर शाळेत आलो त्या दिवशी वर्गाच्या दरवाजावर वाट अडवून उभी राहून "तू दोन दिवस शाळेत का आला नाहीस, आम्हांला करमलं नाही." असा जाब विचारणारी कल्याणी, सर्वांना मदत करणारी धानेश्वरी, नावाप्रमाणेच कृती असणारी करुणा, ज्योती, वाचनाचं महत्त्व आपल्या शाळेबाहेर जाऊन जिल्हाभर अनेक शाळांत जाऊन सांगणारी राधा-काजलची जोडी-अशा कितीतरी लेकरांनी मला अचंबित केलं.

गोंदिया जिल्ह्यातील १२ वर्षांची सेवा पूर्ण करून मी परभणीत नवीन शाळेत आलो. इथेही तीच स्थिती होती. मी शाळेत आलो खरा, पण ज्या वर्गाचा मी वर्गशिक्षक होतो, त्या वर्गातील लेकरं मला स्वीकारायला तयार नव्हती. आठ दिवस होऊन गेले तरी वर्गातील लेकरं माझ्याशी संवाद साधत नव्हती. मी लेकरांना अनेक पद्धतीने आपलंसं करण्याचा प्रयत्न करत होतो, पण काही उपयोग होत नव्हता. एके दिवशी अचानक "तुम्ही आलात म्हणून आमचे आधीचे गुरुजी गेले. तुम्ही आला नसता तर आमचे

गुरुजी आम्हांलाच राहिले असते....” असं नेहा म्हणाली; मी हे ऐकून थक्क झालो. पहिली ते चौथी त्यांच्याशी गट्टी असणारे त्यांचे गुरुजी, मुलं पाचवीत आल्याने दूर झाले. हे दुःख ही लेकरं पचवू शकत नव्हती. पण गुरुजींवर प्रेम करणारी ही लेकरं आहेत, म्हणून मी खूप आनंदित झालो. मी त्यांच्याशी आणखी प्रेमाने वागू लागलो. पुढे हीच लेकरं शाळा सोडून जाताना, मला सोडून जाताना गळयात पडून धाय मोकलून रडली.

उसाच्या फडात, शेळयामेंढ्यांच्या मागे रमणाऱ्या लेकरांच्या मनांत शिक्षण रुजणं हे एक मोठं आव्हान होतं. पारडी ही ऊसतोड कामगारांची वस्ती. (त्याला तांडा म्हणतात.) तांड्यावरील ही लेकरं शाळेत यावीत म्हणून हळूहळू वेगवेगळे उपक्रम राबवायला सुरुवात केली तसतशी मुलं शाळेत रमू लागली-

- **मला बोलू द्या-** रोजच्या परिपाठात प्रत्येक वर्गातील एका मुलास त्याच्या आवडीच्या, त्याच्या मनात असलेल्या विषयावर मनमोकळेपणाने मनसोक्त बोलण्याची संधी दिली जाऊ लागली. माझंही कोणीतरी ऐकून घेतंय, मी बोलू शकतो/ते, असा आत्मविश्वास लेकरांना येऊ लागला.

- **प्रश्न आमचे, उत्तर तुमचे-** परिपाठाच्यावेळी मुलांनी गुरुजींना प्रश्न विचारावेत. त्या प्रश्नांची उत्तरं गुरुजींनी मुलांना द्यावीत. अनेक भन्नाट प्रश्न समोर येऊ लागले. गुरुजींनाही उत्तरं शोधावी लागू लागली.

- **थीम फलक-** शाळेच्या दर्शनी भागावरील फलकावर रोज वेगवेगळी थीम लिहायचो. त्यावर मुलांनी स्वतः लिहून आणायचं व आपल्या वर्गशिक्षकांना दाखवायचं. मुलं रोजच्या विषयाची आतुरतेने वाट पाहू लागली व लिहिती झाली.

- **बालसभा-** दर शुक्रवारी बालसभा होते.




*या लेखातील चित्रं, माने सरांच्या लेकरांनी चितारलेली!*

अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, विषय मुलंच निवडतात व बालसभेमध्ये मुलं एका विशिष्ट विषयावर सर्वांसमोर मोकळी होतात. बालसभा म्हणजे मुलांचं अभिव्यक्तीचं प्रमुख ठिकाण बनलं.

- **पेनमित्र-** पाचवी ते सातवी वर्गातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील वेगवेगळया क्षेत्रात मोठमोठ्या पदावर असणाऱ्या व्यक्तींना पत्र लिहितात. त्यातून अनेक मान्यवरांनी लेकरांच्या पत्रास उत्तर देऊन लेकरांची मैत्री स्वीकारली. खेड्यातील प्राथमिक शाळेतील मुलांना पदावर असणाऱ्या अधिकाऱ्यांचा अप्रत्यक्ष सहवास घडवून देता आला.

- **शिवार भ्रमंती-** महिन्यातून एक दिवस आम्ही आसपास शिवार भ्रमंतीस जाऊ लागलो. मुलांना माती, पशुपक्षी, नाले, ओढे याविषयीची माहिती मिळवत एक दिवस निसर्गाच्या सान्निध्यात घालवल्याने मुलं व गुरुजी यांचं नातं बहरू लागलं.

- **मित्र माझा आरसा-** आपल्या मित्रात जे गुणदोष असतील ते प्रत्यक्ष मित्रांना सांगितले पाहिजेत यासाठी हा एक उपक्रम राबविण्यात आला. दर गुरुवारी ५० मुलांपैकी एकाच्या नावाची चिठ्ठी

काढून त्या विद्यार्थ्यास पुढील १५ दिवस राजा म्हणून सन्मान द्यायचा. १५ दिवस इतर ४९ जणांनी त्याचं निरीक्षण करायचं. नंतर एक दिवस सर्वांनी मैदानावर जमा होऊन कागदावर त्यांच्याविषयीचं निरीक्षण स्पष्ट शब्दांत लिहायचं. त्याने आनंदाने सर्व गुणदोष स्वीकार करायचे. यातून एका लेकराविषयीचा सर्वांगीण दस्तऐवज तयार होतो, तो एका file मध्ये ठेवला जातो. या उपक्रमाच्या माध्यमातून मुलांच्यात असलेले गुणदोष एक मित्र म्हणून मुलं एकमेकांना सांगू लागली. (या उपक्रमाला सर फाऊंडेशनचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे.)

- **आम्ही असे घडलो-** महिन्यातून एकदा वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या मान्यवरांना शाळेमध्ये बोलावण्यात येऊ लागलं. मुलं त्यांच्याशी दिलखुलास गप्पा करू लागली.

- **फोन-संवाद-** अभ्यासक्रमातील लेखक, कवी व इतर मान्यवरांशी मुलांना फोनवरून बोलण्याची संधी दिली जाते.



- **जिंकू-जिंकू-** अभ्यासात मागे पडणाऱ्या मुलांविषयी आम्हांला सदैव प्रश्न पडायचा की त्यांना कसं शिकवावं? परंतु हाही प्रश्न मुलांनीच सोडवला. शाळेतील अभ्यासात पुढे असणाऱ्या मुलांना मागे असणारं मूल जोडीला देऊन त्यांनाही आपल्या बरोबरीला आणण्यासाठी प्रेरित करण्यात आलं. 'आपण सर्वजण जिंकू या' असं म्हणत आम्ही सर्वांना पुढे घेऊन जाऊ लागलो.

- **बलुतेदार भेट/मुलाखत-** बारा बलुतेदार समाजाला कसे उपयुक्त आहेत, हे लेकरांना समजावं, म्हणून दर महिन्यात एका व्यवसायातील प्रतिनिधीला शाळेत बोलावून मुलाखत घेतली जाते. शक्य असेल तर प्रत्यक्ष त्याच्या कामाच्या ठिकाणाला भेट दिली जाते.

शिवाय, आजी-आजोबा संमेलन, आईची शाळेला भेट, पुस्तक भिशी, उत्तम वाचक पुरस्कार, अमृतकण वेचा, बालसाहित्य संमेलन, पाणी संमेलन आदी ४० उपक्रमांची रास मांडली आहे; यामुळे मुलांना शाळेचा लळा लागला.

माझ्या स्वप्नातला गुरुजी मला माझ्या शालेय वयात कधी लाभलाच नाही. मी गुरुजी झालो, तेव्हा ठरवलं की आपण तसा गुरुजी व्हायचं. आज सेवेची १६ वर्षं पूर्ण होताना अनेक 'आनंदाची झाडं' फुलवता फुलवता माझ्यातील गुरुजीही कायम बहरत आहे. माझ्या नव्या नव्या लेकरांच्या बरोबर नव्या वाटेवर चालताना कधी कधी सुंदर पावलांचे ठसे सापडतात, त्यावरून चालताना आपलीच वाट सापडते... तसा प्रवास मी करतोय.

**-युवराज माने**
*yuvrajmane892@gmail.com*
*(प्रयोगशील शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारडी, तालुका सेलू, जिल्हा परभणी)*

# कतरीना...अंहं!!!

**“या**... कतरीना मॅडम...काय म्हणतेय शाळा? अदिती, ही लंबूटांग होणार हं त्या कतरीनासारखीच.” घरात शिरल्या शिरल्या शिल्पामावशीचा प्रश्न आणि पाठोपाठ तिचं फिदीफिदी हसू ऐकून मला जामच राग आला. इतक्यात आईने जवळ बोलावून बोस्टनहून आलेल्या सुषमामावशीची ओळख करून दिली. तेव्हा तिने.. “हॅलो कतरीना.” म्हणत माझ्या हातात मोठ्ठंसं चॉकलेट दिलं. त्याबरोबर “माझं नाव कतरीना नाहीय्ये...माझं नाव केतकी मंदार कुलकर्णी आहे.” असं मी शिल्पामावशीकडे बघत थोडंसं ठसक्यातच सांगून त्या मावशीला थँक्यू म्हणून आत पळाले.

माझं पाळण्यातलं नाव केतकीच आहे. मला ते आवडतंसुद्धा! आई कधीतरी मला लाडाने ‘किट्टू’ म्हणते आणि मी त्याच्या प्रत्येक गोष्टीची कॉपी करते म्हणून बाबा मला लाडाने ‘कॉपी कॅटू’ म्हणतो. पण ‘कतरीना’ म्हटलेलं मात्र मला बिलकूलच आवडत नाही. मला कतरीना अशी हाक मारणाऱ्या माणसांचा मला खू..प राग येतो. खरंतर अमृतवाडी सोडल्यास फारसं आता कुणी मला कतरीना म्हणत नाहीत, पण ही शिल्पामावशी मात्र जेव्हा भेटते तेव्हा कतरीनाच म्हणते आणि म्हणूनच  तिने माझे कितीही लाड केले तरीही तिचा खूप राग येतो. मला कतरीना नाव कसं पडलं, त्याची एक स्टोरी आहे. सांगू का?

गेल्याच्या गेल्या सुट्टीत मी आईबरोबर मावशीआज्जीकडे अमृतवाडीत राहायला गेले होते. समोरासमोर घरं असलेल्या वाडीत. तिथे बाहेर सर्व घरांसाठी एक कॉमन लांबचलांब गॅलरी आणि मध्ये एक चौक आहे. मावशीआजीच्या गॅलरीतल्या एका उंच खुर्चीत बसून येणाऱ्या जाणाऱ्या माणसांकडे बघण्यात माझा मस्त टाइमपास होई.

एकदा शेजारच्या घराबाहेर एक माणूस तिथल्या आजोबांचे केस कापायला आला. आजोबा बाल्कनीतच खुर्चीवर बसले. भावजाने (म्हणजे सगळे त्याला तसं हाक मारताना मी ऐकलं) आजोबांच्या गळ्याभोवती एक पांढरंशुभ्र कापड गुंडाळलं. मग केसांवर पाण्याचा फूस..फूस असा स्प्रे मारला. आणि त्याच्याकडच्या बॅगेतून त्याने मोठा कंगवा, छोटा कंगवा, कात्री असं काय काय सामान काढून कामाला सुरुवात केली. एका हाताने तो कंगव्यात केस घेई आणि दुसऱ्या हातातील कात्रीने ते सफाईने कापून टाकी. कधी कानाच्या, मानेच्या वरचे तर कधी डोक्यावरचे, असे थोडे थोडे केस कंगव्यात घेऊन ते कात्रीने बरोब्बर कापता कापता एकीकडे तो आजोबांशी महागाईविरोधी मोर्चाबद्दल सतत बोलतही होता. आजोबांचे केस आता एकदम छोटे दिसत होते. मग त्याने आजोबांचे केस एका वेगळ्या कंगव्याने विंचरून त्यांच्यापुढे आरसा धरला. अलगदपणे




चित्र- अदिती पाध्ये-देसाई

निघून गेला. दिवसभर मला तो भावजा आणि त्याचं ते केस कापणं डोळ्यांसमोरून जातच नव्हतं. रात्री मी एका हातात कात्री आणि एका हातात कंगवा घेऊन सटासट केस कापतेय, अशीच स्वप्नं पडत होती. दुसऱ्या दिवशीही खुर्चीत बसून मी भावजाची वाट पाहात होते. पण दुपारपर्यंत काही तो आलाच नाही.

पण आता माझे हात मात्र शिवशिवत होते. बसल्याबसल्या मी हातात कंगवा आणि कात्री घेतलीय असं खोटंच समजून हातवारे करत होते. आपल्याला पण त्याच्यासारख्या झटपट हालचाली जमतील का, याचा अंदाज घेत होते.

पण हे प्रत्यक्षात कसं जमणार? भावजासारखं आपल्याकडे कोण येणार?

मग माझं मीच ठरवून टाकलं. कुणी कशाला यायला पाहिजे? उलट कुणाला विचारायला गेलं तर शंभर अडथळे आणतील, त्यापेक्षा आपण आपलेच केस कापू या. माझे केस बऱ्यापैकी लांब आहेत. आई त्याचं मस्तपैकी पोनीटेल बांधते. म्हणून ठरवलं, मागच्या केसांना जराही कात्री लावायची

त्यांच्या अंगावरचे कापड काढून झटकले.

नंतर आजोबांच्या मानेवर डब्यातल्या पावडरचा पफ अलगद फिरवला. मिनीटभर मलाही तो गुबगुबीत पफ आपल्या मानेवर फिरवावासा वाटला. आजोबा आत उठून गेल्यावर केरसुणीने तिथे खाली पडलेले केस उचलून गॅलरी स्वच्छ करून तो

नाही, पण पुढच्या केसांवर हा भावजासारखा प्रयोग करायला काय हरकत आहे!

ठरलं तर मग... दुपारी सगळे मधल्या खोलीत झोपल्यावर मी गुपचुप कात्री, कंगवा आणि भिंतीवर लावलेला छोटा आरसा घेऊन बाहेरच्या खोलीत गेले. मनाशी म्हटलं, भावजासारखं कपडा गुंडाळणं, पाण्याचं फूस फूस काही नको. आपण फक्त दोन हातांची हालचाल करत केस कापायची थोडी प्रॅक्टीस करू. माझी उंची ॲडजस्ट करत आरसा खिडकीशी ठेवला. उजव्या हातात कात्री आणि डाव्या हातात कंगवा घेऊन सुरुवात केली. पण आजोबांसारखे माझे केस छोटे नव्हते ना... त्यामुळे आधी पोनी सोडून त्यातले थोडेसे केस पुढे डाव्या हातात घेऊन नाकापर्यंत आणले आणि भावजाच्या स्टाइलने उजव्या हाताने जमतील तेवढे कात्रीने कापले. फटकन बोटाएवढे लांब केस आरशाच्या पुढ्यात पडले. खरं म्हणजे केस कापण्यापेक्षा मला त्याच्यासारख्या दोन्ही हातांनी सटासट हालचाली करण्यात इंटरेस्ट होता. पण आरशात बघायला गेले तर हातांकडे दुर्लक्ष होई आणि हातातल्या कंगवा-कात्रीकडे बघायला गेले तर आरशात बघणं जमेना. या सगळ्या गडबडीत मला पाहिजे तशी हातांची सटासट हालचाल वाटली तितकी सोपी नव्हती, हे लक्षात आलं. पुढे आलेल्या केसांमुळे आरशात काहीच दिसत नव्हतं.

एवढ्यात आरशापुढे जमलेले केस उचलताना तो वहीएवढा आरसा खिडकीतून खालीच पडला आणि फुटला. झा...लंऽऽ, त्या आवाजाने आई, मावशीआज्जी, समोरची शिल्पामावशी सगळ्या धावत आल्या; शिवाय चौकात खेळणारी दोन-चार मुलंही जमली. मी पटकन फ्रॉकमध्ये तोंड लपवून दाराआड गेले. फुटलेला आरसा... आजूबाजूचे केस... सगळा गोंधळ नुसता!

माझ्या हातातला कंगवा, कात्री बघून "अगं किट्टू, कसला उद्योग चाललाय तुझा?" म्हणत गोंधळलेल्या आईने मला पुढे ओढलं, तेव्हा माझ्याकडे पाहून एक भूत पाहिल्यासारखी 'माय गॉड' म्हणत तोंडावर हात ठेवत शिल्पामावशी किंचाळली.

"अगं काय केलंयस तू केसांचं.. सांग तरी..." वैतागलेली आई.

"मला ना त्या कात्...कत...रीन...." गोंधळून मला पुढचं सांगताच येईना, पण 'कत' शब्द ऐकल्याबरोब्बर त्यावर शिल्पामावशी ओरडली- "काय?.... कतरीना कैफ? तिच्यासारखे केस करायचे होते तुला? कमाल आहे या पोरीची.. कसं सुचतं बाई या वयात?"

तेव्हा मात्र रागारागाने मी शिल्पामावशीकडे बघून "मला मुळ्ळीच कुणाची कॉपी करायची नव्हती... ती कतरीना की फतरीना मला माहीतसुद्धा नाही. मला फक्त भावजासारखे सटासट हात चालवत कात्रीने केस कापता येतात का बघायचं होतं आणि ते करताना..."

..आणि मग मला खूप रडूच यायला लागलं. आज्जीने मला जवळ घेऊन, सगळ्यांना जायची खूण केल्यावर सगळे कुचकटासारखे हसत निघाले, तरी "ए कतरीना" अशी कुणाची तरी हाक कानावर पडलीच.

खरं सांगू का... शिल्पामावशी माझ्या वेड्यावाकड्या केसांना हसली असती तर कदाचित चाललं असतं, पण मला काय म्हणायचंय ते समजून न घेताच कुठल्याकोण कतरीनाची मी कॉपी करते, असं तिने स्वतःच ठरवून तिच्या नावाने चिडवायला सुरुवात केली, म्हणून मला तिचा जास्ती राग आलाय. म्हणून पुन्हा पुन्हा मी ठणकावून सांगते की माझं नाव ..'केतकी मंदार कुलकर्णी' आहे..

**-अलकनंदा पाध्ये**
*alaknanda263@yahoo.com*
*(सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका)*

## शब्दांचं बारसं

**ब्लू-टूथ-** **किंग** हेराल्ड-१ हा डेन्मार्कचा राजा होता. त्याचा काळ इसवी सन ९३५ ते ९८६. त्या काळात नॉर्वे आणि डेन्मार्क यांच्या काही प्रांतांमध्ये सतत कुरबुरी, जबरी चोऱ्या आणि चकमकी चालू असत. या राजाने हे प्रांत स्वतःच्या अधिपत्याखाली आणले. त्यामुळे लढाया कमी होऊन प्रदेशात थोडीफार शांतता नांदू लागली.

या हेराल्ड राजाचे अजून एक वैशिष्ट्य सांगतात, की त्याचे दात Blau होते. त्या काळात या शब्दाचा अर्थ 'काळा' असा असावा असा तर्क आहे. प्रत्यक्षात त्याचा उच्चार कसा असेल, हे आता सांगणं कठीण. मात्र काळाच्या प्रवाहात कधीतरी blau चे blue झाले.

दहाव्या शतकातून आपण येऊ विसाव्या शतकात. १९९६मध्ये जिम कार्डाख (Jim Kardach) या सॉफ्टवेअर तज्ज्ञाने 'The Longship' या नावाची ऐतिहासिक कादंबरी वाचायला घेतली. दिवसभराच्या कामानंतर तो ती वाचत असे. Frans Gunnaar Bengtsson च्या या कादंबरीत दहाव्या शतकातील किंग हेराल्डच्या कालखंडाच्या पार्श्वभूमीवर व्हायकिंग लोकांचे धाडस, लढाया, लूटमार यांचे वर्णन आहे. निळे दात असणाऱ्या हेराल्ड राजाचा काळ या कादंबरीत उभा केला आहे.


हे वाचताना जिमला वाटले, की तो ज्या प्रकल्पावर काम करतोय आणि जी सिस्टम विकसित करायला घेतली आहे, तीसुद्धा या राजासारखेच काम करणार आहे. कोणते? तर तोपर्यंत एकमेकांशी न बोलणाऱ्या मोबाइलला संगणकाबरोबर संपर्क साधणे शक्य होणार आहे आणि संगणकालाही मोबाइलबरोबर! त्याने त्याच्या प्रकल्पाचे नामकरण केले- ब्लूटूथ. आता हे नाव होते प्रकल्पाचे, उत्पादनाचे नाही. निळे दात, ही काही विशेष आकर्षक कल्पना नाही. त्यामुळे ही सिस्टम बाजारात नेताना, कंपनीने नव्या नावाचा शोध सुरू केला. पण जे नवे नाव स्वीकारायचे ठरले, त्या नावाने ट्रेडमार्क अगोदरच घेतला होता.

संगणक आणि मोबाइल फोनमधला अबोला संपवणारे हे सॉफ्टवेअर बाजारात आणायची निकड होती, वेळ घालवून चालणार नव्हते. मग काय, प्रकल्पाला जिमने दिलेले नावच टेक्नॉलॉजीला मिळाले. आज जगभर ब्लूटूथचे कोट्यवधी वापरकर्ते आहेत. त्या नावातील (किंग हेराल्डचे) निळे दात जाऊन आता 'ब्लूटूथ' हे नाव लोकमान्य झालेय!

**-वसुंधरा देवधर**
*vasudeo55p@gmail.com*

# डॉ. सलील कुलकर्णी यांच्याशी गप्पा

**‘वयम्’ मासिकातर्फे डॉ. सलील कुलकर्णी यांच्याशी ‘एकदा काय झालं?’ या चित्रपटाच्या निमित्ताने ऑनलाइन गप्पांचा कार्यक्रम २८ जुलै रोजी झाला. प्रसिद्ध कवी, गायक, दिग्दर्शक डॉ. सलील कुलकर्णी यांनी पालकांशी संवाद साधला. ‘वयम्’च्या संपादक शुभदा चौकर यांनी त्यांच्याशी संवाद साधत, प्रश्न विचारत त्यांना बोलते केले. त्या कार्यक्रमाचा हा वृत्तान्त–**



डॉ. सलील कुलकर्णी यांच्याशी गप्पा हा कार्यक्रम होणार म्हटल्यावर अनेक पालकांनी पटपट नावनोंदणी केली. वेळेत सर्वांनी मिटिंग जॉइनही केली. ‘वयम्’ मासिकाच्या संपादक शुभदा चौकर यांनी बहारदार गप्पांची सुरुवात सलील कुलकर्णी यांची ओळख करून देत केली आणि गप्पांना सुरुवात झाली.

**लहान मुलांसाठी संगीत-रचना करणं, त्यांच्याशी संवाद साधणं हा तुमच्या करियरमधला महत्त्वाचा भाग आहे. या कामाची तुम्हांला ओढ कशी वाटली?**

लहान मुलांसाठी काम करणं सोपं नाही. कारण या मुलांसोबत काम करताना तुमच्यातील लहान मूल जागरूक असावं लागतं. एखादं गिफ्ट पाहिल्यावर लहान मुलांना ते उघडेपर्यंत त्यात काय असेल ही उत्सुकता असते, ती उत्सुकता तुमच्यात असेल तर तुमच्यातलं लहान मूल जागं आहे. पटकन हसू येणं, रडू येणं, एखाद्या गोष्टीचा त्रास होणं हा मुलांचा स्थायिभाव आहे. लहान मुलं खरी

रिॲक्शन देतात. दीड ते चार वर्षांची मुलं गाण्यावर जेव्हा नाचायला लागतात तेव्हा त्यांना हे प्रसिद्ध गीतकाराचं, गायकाचं गाणं आहे हे माहीत नसतं. ते फक्त तालावर ठेका धरतात. माझ्यासाठी ही खरी दाद आहे. 'एका  माकडाने काढलंय दुकान' ही कविता विंदांच्या पुस्तकात वाचताना मी गुणगुणलो.. सहज मला त्याची चाल सुचली आणि त्याचं गाणं झालं. सहजरित्या जे सुचतं, त्यातून तयार होणारी गाणी मुलांना आवडतात. मला जबरदस्तीने मुलांसाठी गाणी करणं जमत नाही. गाणी दोन प्रकारची असतात- रचलेली आणि सुचलेली. मला सुचलेली गाणी करायला आवडतात. मुलांना सहज, सोपी त्यांच्या कल्पनेतली गाणी आवडतात. प्रत्येक मुलाची आवड वेगवेगळी असते. मुलांना आपल्या छोट्या प्रतिकृती समजू नका. त्या वेगळ्या व्यक्ती आहेत, हे कायम लक्षात ठेवलं पाहिजे. माझ्या या कामाचा मला मिळालेला अमूल्य ठेवा म्हणजे पु. ल. देशपांडे यांनी मला पेटी घेऊन घरी बोलावलं आणि मंगेश पाडगावकर, विंदांच्या कविता गाऊन ऐकवायला सांगितल्या. पु. लं माझ्या गाण्याच्या ओळीला दाद देत होते, कारण त्यांच्यातील लहान मूल सतत जागं होतं. आपण फार हिशोबी वागायला लागलो की, आपल्यातलं लहान मूल पळून जातं.

**तुम्ही 'मधली सुट्टी' या कार्यक्रमातून मुलांशी संवाद साधत होतात; 'लिटील चॅम्पस'मध्ये मुलांशी बोलत होतात, त्यावेळी जाणवायचं की तुम्ही मुलांत मूल होऊन बोलता आणि त्यांना 'अजाण' समजत नाही. कलेला जसा रियाज लागतो, तसा मुलांशी बोलण्याचा रियाज करावा लागतो का?**

संवादामध्ये दोन्ही येतं- ऐकणं आणि बोलणं. आपल्याकडे बोलण्यावर अधिक भर दिला जातो आणि ऐकण्यावर कमी. मुलांना जे सांगायचं असतं ते त्यांच्या मनात असतं. त्यांनी शाळेतून आल्यावर 'सांगू का?' असं विचारल्यावर बऱ्याचदा 'आधी जेव, मग बोलू' असं पालकांनी म्हटल्यावर ते सांगायचं राहून जातं. प्रत्येक मुलाचा एक कम्फर्ट झोन असतो आणि मुलं तिथेच व्यक्त होतात. सगळ्यांसमोर सगळी मुलं बोलत नाहीत.

मुलांना पीच बरोबर कळत असतो. बाळ असताना बाळाला शब्द कळत नसले तरी अंगाई कळते. लाडाने मारलेली हाक कळते, रागाने ओरडलेलं कळतं. कंटाळवाणा पीच लावला की आधीच मुलं कान बंद करून बसतात. आपण एकाच वेळी मुलांना किती सूचना देतो? त्या सूचनेतून दुसऱ्या सूचनेत जातो का? गोंधळ झाला की मुलं दुर्लक्ष करतात. तुम्हांला मुलांचं बोलणं ऐकावसं वाटलं पाहिजे. उदा. सांग बरं काय काय झालं शाळेत? असं विचारल्यावर- मूल सांगू लागतं की टीचरने आज आम्हांला... त्याचं ते वाक्य संपण्याआधी 'टीचर काय, आम्ही बाई म्हणायचो तेव्हा', असं बोलून त्याचं बोलणं तोडू नका. यामुळे त्यांचा आपल्याशी बोलण्याचा उत्साह कमी होतो. तुम्हांला त्यांचं ऐकण्याची उर्मी पाहिजे. whats app बघत बघत ऐकताय हे तर मुलांना कळतंच आणि ते मुलांना आवडत नाही. पालकांनी मुलांना वेळ दिला, लक्ष देऊन ऐकलं, तर नक्कीच संवाद घडेल.

**अनेक पालकांना, आजीआजोबांना मुलांशी गप्पा मारताना जनरेशन गॅप जाणवते. 'वयम्' साकारतानाचा आमचा अनुभव आहे की, ज्या घरात आई-बाबा, आजी-आजोबा स्वतः 'वयम्' वाचतात, त्यांना मुलांबरोबर बोलण्याचे विषय मिळतात. 'वयम्'मुळे आमच्यातली जनरेशन गॅप कमी झाली असं सांगणारे आजी-आजोबा आम्हांला खूपदा**

**भेटतात. संदीप खरेंच्या कवितेत आणि तुम्ही दिलेल्या चालींत आजी-आजोबा आणि नातवंड या नात्याला तुम्ही खूप महत्त्व देता. तुम्हांला काय वाटतं, ही जनरेशन गॅप भेदण्यासाठी पालकांनी, आजी-आजोबांनी काय करावं?**

माझा हा नवा चित्रपट गोष्टी सांगणाऱ्या माणसाचा आहे. नाती जवळ येण्यासाठी स्टोरी-टेलिंग हा बेस्ट फॉरमॅट आहे, असं मला वाटतं. आजी, आजोबा, आई, बाबा अशी मंडळी गोष्टी सांगतात तेव्हा फक्त ती गोष्ट नसते. त्यात त्यांचा आवाज असतो, थोपटणं असतं. ती गोष्ट आठवताना या सगळ्या गोष्टी मुलांच्या नजरेसमोर येत असतात. लेक्चर आणि गोष्ट यात मात्र फरक आहे. शिक्षक जेव्हा गोष्ट सांगणार म्हणतात, तेव्हा मुलांचे चेहरे उजळतात. त्यातूनच मग ते मुख्य विषयाला हात घालतात. आमच्या चित्रपटातला जो शिक्षक आहे, तो इम्युनिटी शिकवताना पांढऱ्या पेशी आणि बॅक्टेरिया यांच्यामध्ये रस्सीखेच लावतो. भाज्या खाल्ल्यात तर पांढऱ्या पेशी जिंकतील आणि नाही खाल्ल्या तर बॅक्टेरिया जिंकतील. ही कल्पना अशी शिकवल्यामुळे तो मुद्दा मुलांच्या व्यवस्थित लक्षात राहतो. स्टोरी-टेलिंग हा फॉरमट यासाठी आवडतो की त्यात चार-पाच जण एकत्र येऊन बसतात. आजी-आजोबा, आई-बाबा यांनी एकत्रित बसून गोष्ट सांगायला हवी. कधीतरी मुलांना म्हणावं, आम्ही ऐकतो तू गोष्ट सांग. यातून एकोपा निर्माण होतो.

**दोन्ही पालक नोकरी-व्यवसायात बिझी असताना, त्यांच्या आणि मुलांच्या मोकळ्या वेळा जुळत नाहीत. तुमच्या 'दूरदेशी गेला बाबा, गेली कामावर आई' किंवा 'दमलेल्या बाबाची कहाणी' या गाण्यांनी अनेकांना अंतर्मुख केलं. त्यावेळी तुम्ही तुमचे अनुभव लिहिले होते की, अनेक आई-बाबांनी नोकऱ्या बदलल्या. वर्क-लाईफमध्ये तोल साधण्याचा प्रयत्न करू लागले. मुलांना quality time देण्याची तुमची संकल्पना काय?**

मी माझं ताजं उदाहरण देतो. सध्या मी फिल्म प्रमोशनसाठी सतत फिरतोय. यातच माझ्या मुलीची परीक्षा होती. तिने मला सांगितलं की, "उद्या मराठीचा पेपर आहे आणि तू मला दोन कविता शिकव." मी कामाच्या व्यापामुळे 'नाही' म्हणू शकलो असतो, पण मला हे पटत नाही. म्हणून थोडा मोकळा वेळ होता, त्यात मी माझा फोन सायलेंट मोडवर ठेवला आणि २० मिनिटं पूर्ण फोकसने तिला शिकवलं. मुलांना प्राधान्य देणं आणि फोकस ठेवून त्यांना वेळ देणं आवश्यक असतं.

तंद्री लागलेले चेहरे हल्ली दिसत नाहीत. पेशन्स फार कमी होत आहे. दोघं मिळून आपण हे पाहूयात, वाचूयात, त्यांचे विषय ऐकत बोलूया- हे चित्र फार कमी पाहायला मिळतं. नुसतं बाहेर फिरायला नेणं म्हणजे वेळ देणं नव्हे. काही मुलं अबोल असतात. अबोल असणं हा काही कमीपणा नाही. ते वेगळं फूल आहे, हे लक्षात घ्या. प्रत्येकाची उमलायची वेळ वेगळी असते. शेवटच्या बाकावरच्या मुलाचीसुद्धा काहीतरी गोष्ट असते. त्यालाही काहीतरी सांगायचं असतं. अबोल मुलांनाही काहीतरी सांगायचं असतं. त्याला सांगावसं वाटेल तेव्हा ते ऐकून घ्या.

**तुम्हांला सिनेमा आधी लिहावासा वाटला आणि मग हा मुलांना गोष्टी सांगण्याचा विषय सुचला, की हा विषय खूप प्रकर्षाने मांडावासा वाटला म्हणून सिनेमा हे माध्यम निवडलंत? कसा आहे या सिनेमाचा घडणीचा प्रवास?**

माझी गोष्ट मला जशीच्या तशी दाखवायची



आहे, तेव्हा मला चित्रपट करावासा वाटतो. ‘मधली सुट्टी’ करताना रोज नवीन नवीन गोष्टी सांगितल्या जायचा. गोष्टीवेड्या माणसासमोर अवघड प्रश्न आला तर तो ते कसं सांगेल, असं मनात आलं. यातूनच हा चित्रपट घडत गेला. मुलांना चांगली माणसं दाखवायला हवीत. भलेपण दाखवलं तर त्यांच्यात भलेपण रुजणार. मला व्हिलन फारसे आवडतच नाहीत. सरबतात विष घालून देणार, कड्यावरून ढकलून मारणार, अशी क्रूरता मला दाखवायला आवडत नाही. आपल्या माणसांवर प्रेम करायला लावणारा पण चित्रपट हवा. हा चित्रपट हेच प्रेम दाखवणारा आहे. जाता जाता एवढंच म्हणेन की-

*जे वेचले ते ठेव तू,*
*जे राहिले ते वेच तू*
*या तुझ्या इवल्या मुठीतून*
*स्वप्न हे जपशील ना?*

सलील कुलकर्णी यांनी त्यांचं म्हणणं फार उत्कटपणे मांडलं. छान रंगल्या या गप्पा.

तुम्हांलाही आस्वाद घ्यायचा असेल तर https://fb.watch/ezcfucJU36/ या लिंकला क्लिक करा.

# कोकणभूल

वेशीवर कोकणाच्या लाल मातीचा गालिचा
स्वागताला जुळणारा ताफा ताडांचा माडांचा

सळसळ सर्प नागवाटा चढउतारांच्या
दऱ्या पाचूच्या हिरव्या, कडा माणिक चुऱ्याचा

अवचित दिसे भव्य अहा! अथांग नजारा
उधळीत फेनफुले लाटा गाठती किनारा

मऊ वाळूत रेखली शिल्पे शंख शिंपल्यांची
भणाणत्या वाऱ्यामध्ये बने झुलती सुरुची

येता पाऊस झिम्मड मेघमल्हार गंभीर
जलप्रपातांचा घुमे कड्यांवरती गंधार

कणकण आक्रमक मत्त होती वृक्षवेली
चमचमते पत्थर हिरवट मखमली

कुंज रंगीत फुलांचे दशदिशांना फुलती
पुंज नक्षत्रांचे जणू धरेवर विखरती

मागे सुटले कोकण! मन तिथे घुटमळे
होडी मनाची अजून खालीवर स्वैर डुले

रंगगंधधुंद लाटा माझ्या हृदयी फुटती
कानी सागराची गाज, देते साद लाल माती

**-विद्याधर शुक्ल**
*(शिक्षणतज्ज्ञ)*

# गोलमगोल

**मजेदार भूगोल-कथा!**

**“आज** वर्गात खूप म्हणजे खूप मज्जा आली. आमचं हसून हसून पोट दुखू लागलं.”

“अरे काय झालं काय एवढं हसायला? वर्गात कुणी धांगडधिंगा नाच तर नाही ना केला?”

“अगं आज्जे त्यापेक्षा धम्माल आली.”

“म.. ताईंची बोलणी खाल्ली वाटतं?”

“नाही. नाही. त्यांनी फक्त एक प्रश्न विचारला आणि त्यानंतर मुलांनी जी काही खतरनाक उत्तरं दिली त्यानेच धमाल उडाली.”

“अरे काय ते नीट सांग..”

“ताई म्हणाल्या, आपण सगळे जण पृथ्वीवर राहतो आणि पृथ्वी गोल आहे.’ त्या बरोबर काही मुलं हात वर करून जोरजोरात हसत बोलू लागली.

एकजण म्हणाला, ‘पृथ्वी जर गोल असेल तर वर राहणारी माणसं खाली खाली घसरत येतील आणि खाली माणसांचा डोंगर होईल.”

दुसरा म्हणाला, “गोल पृथ्वीवर सरळ कसं चालता येईल? आपण गोल गोल चाललं पाहिजे ना?”

तर तिसरा आणखीन पुढे म्हणाला, “गोल पृथ्वीवर चालताना आपण काही सारखे धडपडत नाही आणि घसरगुंडी पण करत नाही? म्हणजे मग आपली पृथ्वी सपाटच असणार ना? काऽऽऽय?”

“मग ताईंनी विचारलं, आणखी कुणाला काही सांगायचं आहे का?”

तेव्हा चौथा मुलगा म्हणाला, “ताई ताई, पृथ्वी गोलच असणार कारण चंद्र गोल आहे आणि सूर्य पण गोलच आहे!”

“व्वा! तुमच्या वर्गातली मुलं भलतीच हुशार आहेत तर. पण मला सांग अन्वय, तुला काय वाटतं?..”

आजीला थांबवत डोळे मोठे करून अन्वय म्हणाला, “म्हणजेऽऽऽ? मला माहीतच आहे की. अगं आपल्याकडे संपूर्ण पृथ्वीचा नकाशा तर आहेच पण तो काय कपाटात पृथ्वीचा गोल पण आहे.”

“पऽऽण पृथ्वी गोल आहे हे तू कसं काय सिद्ध करशील?”





*चित्र- गिरीश सहस्रबुद्धे*

"आजी त्यासाठी आपल्याला समुद्रावर जावं लागेल. कारण, आपण जर समुद्राच्या किनाऱ्यावर उभं राहून जाणारं आणि येणारं जहाज पाहिलं तर आपल्याला लगेचच समजतं."

"कसं समजतं? ती जहाजातली माणसं सांगतात का?"

"अगं तसं नव्हे. जहाज किनाऱ्यापासून लांब जाताना त्याचा तळ प्रथम दिसेनासा होतो. मग वरचा भाग. आणि सर्वात शेवटी जहाजाची उंचच्या उंच डोलकाठी."

"आणि येताना पण असं दिसतं का?"

"अहं. येताना प्रथम डोलकाठी दिसते. नंतर मधला भाग दिसतो. आणि सर्वात शेवटी सगळं जहाज दिसतं."

"तुझं बरोबर आहे. पण यामुळे पृथ्वी गोल आहे हे कसं कळलं, ते मला नाही कळलं."

"पृथ्वी जर सपाट आहे अशी कल्पना केली तर आपल्याला फक्त क्षितिजापर्यंतच दिसतं. त्याच्या पुढे गेलं तर खाली पडायला होईल. पण तसं होत नाही ना? म्हणून तर किनाऱ्यावरून जहाजाचं येणं-जाणं पाहून पृथ्वी गोल असल्याचा अंदाज करता येतो."

"शाबास! पण समजा आमच्या गावात काही समुद्र नाही. आणि समुद्र नाही म्हणून जहाजं पण नाहीत. तर मग आमच्या गावातल्या लोकांना घरात बसूनच कसं कळणार की पृथ्वी गोल असेल?"

"अं.. हा जरा कठीणच प्रश्न वाटतोय.."

आजी म्हणाली, "तुमच्या वर्गातल्या चवथ्या मुलाने दिलेल्या उत्तराचा थोडा वेगळ्या प्रकारे विचार कर बरं. म्हणजे त्यांचं समोरासमोर येणं, त्यांचं लपणं छपणं वगैरे."

आनंदाने अन्वय ओरडला, "येऽऽऽस. कळलं. चंद्रग्रहणाच्या वेळी पृथ्वीची सावली चंद्रावर पडते व त्यामुळे तो दिसेनासा होतो. चंद्राचा प्रवास पृथ्वीच्या सावलीतून होताना त्या सावलीची कडा नेहमीच वर्तुळाकार दिसते. आणि कोठूनही पाहिली तरी ती वर्तुळाकारच दिसते. म्हणजे पृथ्वी गोलच की. काऽऽय?"

"भले शाबास! आता तू या गोल पृथ्वीवरून कधीच गडगडत खाली जाणार नाहीस."

'जे अवकाशाचा वेध घेतात तेच क्षितिजाच्या पलीकडचं पाहू शकतात..' ही हुनान प्रांतातील चिनी म्हण लक्षात असू द्या.

**-राजीव तांबे**
*rajcopper@gmail.com*
*(प्रसिद्ध बालसाहित्यिक)*



# Hide & Seek

Illustrated by Mahimkar Sisters

Some objects are playing hide & seek beside,
can you find them all?



# माझे वाक्प्रचार

**मुलांनो,** तुम्ही नेहमी वाक्प्रचार ऐकता, वाचता, लिहिता. पण आज तुम्ही तुमचे वाक्प्रचार तयार करणार आहात. होय, तुमचे स्वतःचे वाक्प्रचार!

आपण बिनकामाचे बसलो असताना आई आपल्याला नेहमी म्हणते, 'काय बसला आहेस 'माशा मारत, अभ्यासाला बस की.' किंवा कधी कधी बाबांच्या बोलण्यात आपण ऐकतो- 'आपले घोंगडे अडकले आहे. नाहीतर मी मूग गिळून गप्प बसलो नसतो.'

आजी बोलताना म्हणते, 'चांगले झाले हो, दुधात साखर पडली.' किंवा आपल्या शिक्षकांच्या तोंडून तुम्ही कधीतरी ऐकलं असाल की, 'आज हेडसरांच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला.

यामध्ये माशा मारणे, घोंगडे अडकणे, मूग गिळून गप्प बसणे, दुधात साखर पडणे, अंगाचा तिळपापड होणे असे वाक्प्रचार आपण कमी शब्दात अधिक अर्थ व्यक्त करण्यासाठी वापरतो. एखादा लांबलचक परिच्छेद बोलून जे काम होणार नाही, ते एखाद्या वाक्प्रचारामुळे होऊ शकते. वाक्प्रचारांमुळे भाषेची शोभा वाढते. भाषेमध्ये समर्पकता आणि अनेकार्थता येते.

वाक्प्रचार तयार करणे खूप सोपे आहे. आपल्या नि आजूबाजूच्या माणसांच्या वागण्या-बोलण्यात अनेक बारीकसारीक कृती घडत असतात. त्याकडे जाणीवपूर्वक आणि विचारपूर्वक भाषेकडे लक्ष दिले की, आपल्यालाही वाक्प्रचार तयार करता येतात.

आमच्या शाळेतल्या मुलांनी त्यांचे स्वतःचे वाक्प्रचार तयार केले आहेत.

वर्गात दररोज हजेरी घेत असताना एक विद्यार्थी अधूनमधून गैरहजर असायचा. तेव्हा त्या विद्यार्थ्यांच्या मित्रांना 'तो का आला नाही? कुठे दिसला का?' असे मी विचारल्यानंतर ते म्हणायचे, 'सर, तो तळ्यावर फिरतो आहे.' आमची शाळा ज्या गावात आहे, त्या गावाच्या मधोमध एक तळे आहे. त्याच तळ्याच्या सभोवती दुकाने, हॉटेल्स वगैरे आहेत. दिवसभर गावातील माणसे तिथेच रेंगाळत असतात. तेव्हा तो मुलगा अधूनमधून









## आपण नेहमी वाक्प्रचार ऐकतो, वाचतो, लिहितो. आपण स्वत:चे वाक्प्रचारही तयार करू शकतो. प्रयत्न करणार?

*चित्रं- धनंजय गोरेगावकर*

शाळा बुडवून नेहमी तळ्यावर फिरत असायचा. शाळेत येत असताना त्याचे मित्र त्याला पाहायचे आणि वर्गात मी विचारल्यानंतर 'तो तळ्यावर फिरतोय' असे उत्तर द्यायचे. हे ऐकून मी विद्यार्थ्यांना सांगितले की, इथे आपला एक वाक्प्रचार तयार झाला, 'तळ्यावर फिरणे!' आणि त्याचा अर्थ आहे 'शाळा बुडवणे'! अशाप्रकारे आमच्या वर्गाचा पहिला वाक्प्रचार आम्ही तयार केला. मग वाक्प्रचार कसे तयार करायचे हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आले.

एकदा वर्गात दोन विद्यार्थ्यांचे भांडण लागले. त्या भांडणामध्ये एकाने दुसऱ्याला आपल्या कंपासमधील कर्कटक काढून दाखवले. हे तिसऱ्या एका मुलाने पाहिले आणि त्यावरून त्याने नवीन वाक्प्रचार तयार केला 'कर्कटक दाखवणे' त्याचा अर्थ 'भीती दाखवणे'.

एक विद्यार्थी एका आडदांड विद्यार्थ्याला पाहून डेस्कखाली लपला. लगेच त्यावरून एकाने वाक्प्रचार तयार केला 'डेस्कखाली लपणे' म्हणजे 'भीतीने घाबरून जाणे'.

आपण मोबाइलवर स्टेटस् ठेवतो. यावरून एकाने वाक्प्रचार तयार केला. 'स्टेटस् ठेवणे' म्हणजे 'आपले प्रदर्शन मांडणे.' एखादे दिवशी कोणीतरी खूपच उत्साहात असतो. हे बघून एकाने वाक्प्रचार तयार केला, 'फुल्ल चार्ज होणे' म्हणजे 'अति उत्साही असणे'.

कधी कधी खूप आनंद झाल्यामुळे काहीजण मोठ्याने बोलतात. हे ऐकून एकाने वाक्प्रचार तयार केला, 'माईक लावणे' म्हणजे 'मोठ्याने बोलणे'.

अशा पद्धतीने माझ्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे वाक्प्रचार तयार केले-

*चिखलात अडकणे- संकटात सापडणे.*
*जीभ दाखवणे- चिडवणे.*
*तोंडाला मास्क लावणे- बोलणे बंद करणे.*
*पाणंदीत गाठणे- एकट्याला गाठणे.*
*च्युइंगम लावणे- चहाडी लावणे.*
*डीपी बदलणे- मार देऊन चेहरा बिघडवणे.*
*उदबत्ती ओवाळणे- खोटी स्तुती करणे.*
*पंक्चर असणे- कामातून गेलेला असणे.*

तुम्हीही तयार करा तुमचे स्वतःचे वाक्प्रचार! आणि आपल्या मराठी भाषेमध्ये तुमच्या नव्या वाक्प्रचारांची भर घाला. स्वतःचे वाक्प्रचार तयार केले की, मग तुम्हीही अभिमानाने सांगू शकाल की हे 'माझे वाक्प्रचार' आहेत म्हणून! आणि ते आवडले तर तुमच्या आसपासचे इतरही वापरू लागतील तुमचे वाक्प्रचार!

**-बालाजी इंगळे**
*balajimingale@gmail.com*
*(प्रयोगशील शिक्षक व कवी, ग्रामीण प्रशाला, माडज. ता. उमरगा, जि. उस्मानाबाद.)*




"Aaji, I got two stars today." Ashwin showed his wrist as he came out of the classroom.

"What for...?" Mani Aaji, his grandma, asked inquisitively. She came every day to pick up Ashwin from school.

"I explained 'seed germination' steps properly."

"That's nice... and the other one?"

"I drew a fire engine and a fire fighter ex...tin...guish...ing the fire. Teacher liked my drawing. So..."

"But you were afraid you won't be able to draw!" "I remembered your words 'Try sincerely and you can do it.'" Ashwin said so innocently that Aaji couldn't stop pulling his cheeks.

Six year old Ashwin stayed with his grandparents as his parents were doctors, both working in a municipal hospital at the other end of the city. Since Ashwin had always stayed with his grandparents, it was unanimously decided to enroll him to a school close to their house. Even Mani Aaji had whole heartedly taken Ashwin's responsibility so that his parents could focus on their hospital duties. Ashwin met his parents mostly on weekends.

Mani Aaji was a hands-on Aaji. She was always vigilant, be it Ashwin's school, studies or extra-curricular activities. Draped in a saree, holding a yoga mat in one hand and a sack on her back, she would be seen juggling between the ground and her house, with Ashwin's hand firmly gripped in her other hand. Their walk to the school was a similar sight but for a long umbrella instead of the mat. Ajoba, Ashwin's grandfather, would help her whenever possible but his business kept him busy with clients and work.

Aaji's world revolved around Ashwin so much that when Ashwin went to his parents' home on weekends, she would feel lost without Ashwin being around.

One day, Ashwin came running down the school stairs very excited.

"We have a doll wedding day after. Teacher has asked boys to get the 'broom' and girls 'fried'." He said hurriedly. Aaji couldn't control her laughter. Ashwin was clueless why Aaji was laughing so much.

"It's 'groom' and not broom. Groom is a 'dulha-doll'. Broom is a jhadu for cleaning the floor. And it's not fried but 'bride', the 'dulhan-doll'. Remember Aashu Mavshi's wedding where she was the bride and Om kaka the groom?" Aaji explained with in-between bouts of laughter. "But that's fantastic. I have enjoyed so many doll weddings when I was your age. I had a collection of beautiful dolls and I loved playing with them." Aaji added getting nostalgic.

"But, I don't have a doll." "Don't worry we will get one for you."

"Aaji can we have the dulha driving a dumper truck?" Ashwin's query while walking back home, to which Aaji had another good laugh. After dropping Ashwin home, Aaji

went on the 'dulha search' mission at the nearby market. Luckily, Ajoba was home that day to be with Ashwin.

Aaji searched for a long time in different shops but couldn't find the dulha-dulhan pair anywhere. All the shopkeepers told her that she wouldn't find them in that market and she should check in the main market. But that was quite far off from their home. Suddenly, she had an idea. 'When there is no option, you need to create one!' She said to herself. She bought a simple doll wearing a western outfit.

"But Aaji, this is a girl not a boy." Ashwin protested on seeing the doll.

"Don't worry. We will convert it into a broom, sorry groom." Aaji said winking her eyes.

"But… how?"

"Ashwin, just believe in your Aaji. She will definitely do something." Ajoba assured Ashwin. That afternoon, when Ashwin was sleeping, Aaji got to task. She cut the doll's long hair into a boy-cut. From shimmery red and yellow fabric pieces that she already had, she stitched an attractive wedding suit and dressed the doll. She then made a decorative turban like what grooms wear in marriages.

Using some pearls, she made a necklace that she put around the doll's neck and a garland that she tied to the doll's forehead. Finally, she painted a moustache and a vermillon on the doll's face. She had an old show-piece of a horse on which she mounted that doll. By evening, the dulha was ready.



"Aaji, this dulha looks more beautiful on a horse than a dumper truck." Ashwin said after he woke up and saw the all revamped doll.

"You can do anything for Ashwin." Even Ajoba was surprised to see the makeover.

"Yes! My Mani Aaji is a magician." Ashwin hugged Aaji tightly. For Aaji, Ashwin was her world.

On a late evening, when they were returning from their usual ground routine, Aaji spotted three stray dogs barking in the lane that they took to reach home. It was a deserted lane and had only one dim street light. Ashwin firmly gripped Aaji's hand as he was very scared of dogs. Aaji looked around to see if she could find some help. But Ashwin's friends had already left as Aaji and Ashwin were the only ones who walked their way home. Aaji knew she had to muster courage to cross that lane as it was their only way to reach home.

"Be brave. Just look down and keep walking close to me." Aaji said firmly. Tucking the free end of her saree's pallu firmly, Aaji took a deep breath. She took Ashwin's sack in her left hand and his yoga mat in her right.

As they started moving further, the dogs frantically came charging towards them. Aaji swayed the yoga mat and the sack in all directions as if it were a sword and a shield. She started screaming to shoo them away. This frightened the dogs and they backed off a bit. Luckily, a couple, who was passing by, joined in. They kept shouting till the dogs finally ran away and they all crossed the lane safely. By this time, people who had gathered there praised Aaji for her courage. Ashwin was awestruck seeing Aaji in that 'avatar'.

After reaching home, Ashwin narrated the incident to Ajoba replete with actions.

"You fought the dogs? You are so much scared of them yourself." Ajoba asked rather surprised.

"When in a tough situation, the strength comes from within." Aaji smiled.

"Ajoba, at that time I felt Mani Aaji resembled Rani Lakshmi Bai who fought the British alone. Remember that story we read? Is that why you often call her 'The modern-day Man…kar…ni…ka'?"

"Absolutely! That's Rani Lakshmi Bai's maiden name, which by the way, is also your Mani Aaji's real name… Mankarnika!"

**-Prachi Mokashi**
*mokashiprachi@gmail.com*

माझे किशोरवय

**२०२१ सालचा साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार आणि इतर अनेक पुरस्कार मिळालेला युवा लेखक म्हणजे प्रणव सखदेव. त्याचं किशोरवय कसं होतं ते त्याच्याकडून जाणून घेऊ या.**

# प्रणव सखदेव



**मी** आत्ता जरी पुण्यात राहात असलो तरी मी मूळचा कल्याणचा. माझं शालेय शिक्षण कल्याणच्या 'कॅ. रवींद्र माधव ओक हायस्कूल'मध्ये झालं. शाळेत असताना मी शाळेतर्फे व क्लबमार्फत क्रिकेट खूप खेळायचो. तेव्हा मला त्यातच करियर करायचं होतं. दुसरं काही विश्वच नव्हतं! पण पुढे मात्र वाचन, कविता हे सगळं आयुष्यात आलं आणि क्रिकेट मागे पडलं. योग्य वयात क्रिकेट सुटलं हे एका अर्थी बरंच झालं. कारण त्यात करियर करणं हे फारच मोठं आव्हान असतं.

आमच्या घरात वाचनाचं वातावरण अजिबात नव्हतं. रोजचा पेपर आणि एखादं मासिक तेवढं यायचं. त्यामुळे लहानपणी पेपर, घरी येणारं मासिक आणि शाळेची-अभ्यासाची पुस्तकं एवढंच मी वाचायचो. मी अभ्यासात चांगला होतो. वर्गात नेहमी पहिल्या दहांत यायचो. एकदा आठवीत असताना पावसात भिजलो आणि तो अनुभव नकळतपणे कवितेच्या रूपात मी व्यक्त केला. तेव्हा जाणवलं की आपला एखादा अनुभव असा शब्दांमध्ये मांडता येतो! मग मी कविता करायला लागलो. मी अभ्यासासाठी ज्या क्लासला जायचो, ते भालेकर सर त्यांच्या घरीच क्लास घ्यायचे. भालेकर सर आणि शाळेतल्या मराठीच्या नीता

माळी मॅडम हे दोघेही खूप वेगळ्या पद्धतीने शिकवायचे. म्हणजे पुस्तकातला एखादा धडा किंवा कविता शिकवताना ते फक्त त्या कवितेपुरतं किंवा धड्यापुरतं शिकवायचे नाहीत, तर त्याचे संदर्भही सांगायचे. तो धडा किंवा कविता मूळ कुठल्या पुस्तकात आहे, त्या लेखक-कवींचं इतर साहित्य कोणतं आहे, लेखनशैली कशी आहे- अशा बऱ्याच गोष्टी ते सांगायचे. वाचनालयात नेऊन त्यांची पुस्तकं दाखवायचे. त्यामुळे मला जाणीव झाली की साहित्य, पुस्तकं, वाचन ही गांभीर्याने घ्यायची गोष्ट आहे. मी तेव्हा थोडंफार लिहीत होतो. पण खूप वाचलं पाहिजे हे जाणवलं आणि मग आईकडे हट्ट करून कल्याणमधल्या एका मोठ्या वाचनालयाचं सभासदत्व मी घेतलं. ते घेतानासुद्धा आईने विचारलं होतं की "नक्की वाचणार आहेस का, तर पैसे भरते.." मी म्हटलं "आत्ताच सांगता येणार नाही, पण मला प्रयत्न तर करू दे!"

माझं वाचन सुरू झालं. सुरुवातीला कवितांकडे जास्त कल होता. आधी मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर, वसंत बापट यांचं साहित्य वाचलं. मग बा. सी. मर्ढेकर वाचले. ते वाचताना लक्षात आलं, की कविता करणं हे गंभीर काम आहे. मला कविता सुचत होत्या, मी लिहीत होतो ते ठीकच होतं; पण जास्त वाचलं पाहिजे हे जाणवलं.

भालेकर सर आणि त्यांच्या क्लासमधली मुलं असा आम्ही मिळून एक दिवाळी अंक काढला होता. त्यासाठी वेगवेगळ्या लोकांना पत्रं पाठवून आम्ही साहित्य मागवलं. पुढे एक-दोन वर्षं आम्ही तो दिवाळी अंक काढत होतो. खूप छान अनुभव होता तो! शाळेत मराठीच्या नीता माळी मॅडम आणि इंग्लिशचे शिंदे सर या दोघांनीही मराठी आणि इंग्लिश भाषांची गोडी लावली. शेक्सपिअरबद्दल काही शिकवताना शेक्सपिअर कोण होता ते सर समजावून सांगत. कधी एखादं पुस्तक आणून दाखवत. या दोन्ही शिक्षकांनी कधी "हे करा" असं सांगितलं नाही, पण "हे असं असतं" हे मात्र सांगितलं. व्याकरण शिकवलं, ते रोजच्या बोलण्या-लिहिण्यात आपण कसं वापरतो ते सांगितलं. महत्त्वाचं म्हणजे ते दोघेही माझं म्हणणं व्यवस्थित ऐकून घ्यायचे, मी काही लिहून दिलं तर वाचायचे, मला वेळ द्यायचे.

मी सुरुवातीला म्हणालो तसं, वाचन माझ्या आयुष्यात येण्याआधी क्रिकेट हेच माझं जग होतं. सोसायटीतल्या मुलांशीही मी क्रिकेट खेळायचो. ती मुलं माझ्यापेक्षा मोठी, कॉलेजमध्ये जाणारी होती. त्यांच्याशी खेळताना माझ्या वयाच्या मुलांमध्ये होणार नाहीत अशा गप्पा मला ऐकायला मिळायच्या. कॉलेजबद्दल, मुलींबद्दल ते सगळेजण बोलत असायचे. मला त्यांचे विषय कळायचे नाहीत, पण आपल्यापेक्षा वेगळं, मोठं जग बाहेर आहे, हे मात्र कळायला लागलं.

पुढे मी माटुंग्याच्या रुईया कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यावर तर ते मोठं जग आणखीनच कळलं. मला दहावीत चांगले मार्क्स मिळाले होते, त्यामुळे मी सायन्सला गेलो. शैक्षणिक वर्ष अर्धं संपल्यावर मला जाणवलं की सायन्स आवडत नाहीये असं नाहीये, पण त्यासाठी भाषा सुटणं नको आहे. मग मी रुईयामध्ये आर्ट्सला जायचं ठरवलं. मी आठवी-नववीत असताना कविता करायचो, लिहायचो, भरपूर वाचायचो. या सगळ्याचं आई-बाबांना खूप कौतुक होतं. पण त्यांना काळजी वाटायला लागली की कॉलेजचं शिक्षणसुद्धा आर्ट्समधलं घेतलं तर हा पुढे काय करणार! मी सायन्स सोडून आर्ट्सला गेल्यावर काही नातेवाइकांनी माझ्याशी बोलणं कमी केलं, आमच्याशी संपर्क कमी केला. पण मी बारावीत पहिला आलो.

ते बघून हळूहळू माझ्या आई-बाबांच्या लक्षात आलं की आर्ट्स हेच माझं क्षेत्र आहे. त्यांनी



*प्रणव सखदेव यांचे बाबा, लहान भाऊ, ते स्वतः आणि त्यांची आई*



*प्रणव सखदेव त्यांची आजी आणि लहान भावासमवेत*

हे समजून घ्यायला वेळ घेतला, आमच्यात सुरुवातीला संघर्ष झाला. पण मीही बंडखोर न होता, आक्रस्ताळेपणा न करता स्वतःला सिद्ध केलं. त्यानंतर मात्र माझ्या आई-बाबांनी मला संपूर्ण पाठिंबा दिला.

या सगळ्यात एक गोष्ट आवर्जून सांगायला हवी. माझी आजी (आईची आई) तेव्हाच्या परिस्थितीमुळे फारशी शिकलेली नव्हती. मात्र तिला शिक्षणाची नितांत आवड होती. ती मला लहानपणापासून सतत सांगायची, की नेहमी काही ना काहीतरी शिकत राहा. हे तिने सांगितलेलं मला त्या वयात फारसं कळायचं नाही, पण ते माझ्यात कुठेतरी झिरपत राहिलं. आजीने मला शिक्षणाच्या बाबतीत खूप पाठिंबा दिला. अगदी मी सायन्स सोडून आर्ट्सला जाण्याचा निर्णय घेतला तेव्हाही ती माझ्या मागे खंबीरपणे उभी राहिली.

रुईयामध्ये गेल्यावर मला वेगवगेळ्या ठिकाणचे मित्र-मैत्रिणी मिळाले. अगदी दादर-नायगावच्या निम्न आर्थिक स्तरातल्या मुलामुलींपासून ते बांद्रा-सांताक्रूझसारख्या उच्चभ्रू वस्तीतल्या मुलामुलींपर्यंत.

आम्हांला रुईयामध्ये मराठी शिकवायला प्रा. मीना गोखले बाई, प्रा. लीना केदारे बाई होत्या. त्यांचं शिकवणं, त्यांचा सहवास हा माझ्यासाठी turning point ठरला. मला आठवतंय, एकदा लेक्चरमध्ये गोखलेबाई बा. भ. बोरकरांची कविता शिकवत होत्या. मी तेव्हा एकदम बंडखोरीच्या मूडमध्ये होतो. बाई बोरकरांची कविता शिकवत असताना मी एकदम वर्गात हात वर करून बाईंना म्हटलं की मला ही कविता काही पटत नाही. त्यांनी विचारलं "का?" त्यावर माझ्याकडे उत्तर नव्हतं. त्या म्हणाल्या, थोडा वेळ घे, आठवडाभर विचार कर आणि तुला काय वाटतं ते मला लिहून दे. या घटनेमुळे मला जाणवलं की नुसती बंडखोरी उपयोगाची नसते, तर आपलं म्हणणं नीट अभ्यास करून, संदर्भ शोधून, मुद्देसूद मांडता येणं आवश्यक असतं.

रुईयामध्ये मला खूप मोकळं, मोठं जग आणि वातावरण अनुभवायला मिळालं. मला नेहमी असं वाटतं की, लहान मुलांना वेगवेगळ्या गोष्टींचं exposure दिलं गेलं पाहिजे. त्यांची नवीन नवीन गोष्टींशी ओळख करून देणं खूप आवश्यक असतं. माझी मुलगी आत्ता साडेचार वर्षांची आहे. पण आम्ही तिच्यासाठी पहिली महत्त्वाची गोष्ट केली ती म्हणजे तिला चांगल्या मराठी शाळेत घातलं.

पुण्यातल्या 'अक्षरनंदन' शाळेत ती आहे. माझी पत्नी ग्राफिक डिझायनर आहे, आम्ही दोघेही फ्री लान्स पद्धतीने काम करतो. त्यामुळे मुलीसाठी आम्हांला व्यवस्थित वेळ देता येतो. आम्ही तिला चित्रं दाखवतो, सिनेमे दाखवतो. तिला चित्र-प्रदर्शनांना घेऊन जातो, अगदी भाज्या आणायलाही आमच्याबरोबर घेऊन जातो. आता भाजी घेतली की तिला पैसे द्यायचे असतात. त्यामुळे छोटे छोटे हिशेब, छोटं गणित तिला आपोआपच समजतं.

आमच्या घरी भरपूर पुस्तकं आहेत. त्यामुळे तिचा भाषिक विकास लवकर झालाय. आम्ही 'वयम्'चेसुद्धा नियमित वाचक आहोत. 'वयम्' हे किशोरवयीन वाचकांसाठी असलं, तरी तिला त्यातली चित्रं दाखवणं, तिला समजतील अशा गोष्टी वाचून दाखवणं, हे आम्ही आवर्जून करतो. या सगळ्या गोष्टी करत असल्यामुळे ती स्वभावाने खूप संवेदनशील आहे.

किशोरवयात मिळालेल्या भाषेच्या exposure मुळे आणि नंतर मिळालेल्या योग्य मार्गदर्शनामुळे मला माझ्या आयुष्याचा, करियरचा मार्ग सापडला, असं नक्कीच म्हणता येईल.

**-शब्दांकन : अंजली कुलकर्णी-शेवडे**

*anjalicoolkarni@gmail.com*

(प्रसिद्ध निवेदिका)

# पंचरत्न पोहे

**साहित्य-** एक कप जाड पोहे, अर्धी वाटी ओल्या नारळाचा चव, दोन पिकलेली केळी, मूठभर भाजलेले शेंगदाणे, खाण्याचे दोन चमचे गूळ पावडर किंवा पिठी साखर, चिमूटभर वेलचीपूड, मीठ व मीरपूड, सजावटीसाठी पाव वाटी डाळिंबाचे दाणे आणि मिक्स ड्रायफ्रूट्सचे तुकडे.



**कृती-** प्रथम चाळणीत पोहे घेऊन, नळाखाली धुऊन निथळत ठेवा. नंतर पसरट असलेल्या वाडग्यात केळी कुस्करून घ्या. त्यात भिजलेले पोहे, नारळाचा चव, भाजलेले शेंगदाणे, गूळ पावडर आणि वेलचीपूड, मीठ व मीरपूड घालून सर्व मिश्रण एकजीव करून घ्या. सर्व्हिंग बाऊलमध्ये हे पंचरत्न पोहे काढून घेऊन डाळिंबाचे दाणे आणि मिक्स ड्रायफ्रूट्सचे तुकडे घालून सजवा.

**-वैशाली खाडिलकर**

*vaishalik914@gmail.com*




# मैत्र

**चित्रकलेचा** तास अगदी रंगात आला होता. मुलं आज पेन्सिल स्केच पद्धतीने चित्र काढायला शिकली होती. नवीन शिकण्याचा आनंद सगळ्यांच्या चेहऱ्यावर होता. मुलांनी त्यांच्या वयाच्या मानाने काढलेली चित्रं पाहून देसाई सरही मनोमन खूश झाले. प्रेमळ, मितभाषी आणि जाडजूड चष्मा लावणारे चित्रकलेचे देसाई सर सगळ्यांचे आवडते सर होते. तास संपला. मुलं रांगेने चित्रकला कक्षातून वर्गात निघाली. "पुढच्या वेळी रंगपेट्या न विसरता आणा रे! पुढच्या तासाला मी काहीच शिकवणार नाही. तुम्हीच विषय निवडायचा, चित्र काढायचं आणि रंगवायचं." सर म्हणाले. शाळेत नवीन आलेल्या राजूचा चेहरा तेव्हाच पडला. अकाली वडील गेल्याने नाइलाजाने खेडेगावातून आईबरोबर आलेला राजू, किरकोळ अंगकाठीचा आणि सावळा असला तरी तरतरीत होता.

आयुष्यातल्या प्रसंगांनी का कोण जाणे, पण इतर मुलांपेक्षा त्याची समज चांगली होती. घरकाम करणारी आपली आई महिन्याचा खर्च भागवता भागवताच मेटाकुटीला येते, हे त्याला माहीत होतं. मला रंगपेटी हवी असं तिला सांगणं त्याला पटत नव्हतं. रंगपेटी न आणावी तरी पंचाइत. चित्रकलेचा तास पुढच्या सोमवारी आहे, तोपर्यंत बघू काय करता येईल ते! असा विचार करेपर्यंत तो वर्गात पोहोचला होता. राजू अचानक गप्प झालाय हे दक्षच्या नजरेतून सुटलं नाही. त्याने राजूला कारणही विचारलं, पण राजूने ते टाळलं.

इतिहासाचा तास सुरू झाला. महायुद्ध आणि त्याचा जनजीवनावर होणारा परिणाम, यावर सर बोलत होते. युद्धामुळे खेळण्यांसाठी धातू, कागद, रंग सगळ्यांचीच कमतरता कशी निर्माण झाली? मुलांचं बालपण आनंदी ठेवायला पालक आणि शिक्षक कसे झटत होते? याच्या कथा सर सांगत होते. का करतात लोक युद्ध? हा प्रश्न सगळ्या वर्गाच्या डोक्यात उमटला होता, इतकं सरांनी त्यांच्या डोळ्यांपुढे सगळं उभं केलं होतं.

हा हा म्हणता आठवडा संपला. रविवारी संध्याकाळी गावाहून आणलेल्या पेटीत खुडबूड करून राजूने रंगपेटी शोधलीच! पण काळा आणि पांढरा रंग वगळता सगळे रंग संपले होते.

तरीही ती पेटी आणि ब्रश राजूने बॅगेत टाकले. चित्रकलेचा तास सुरू झाला. राजू अस्वस्थ आहे हे दक्षच्या लक्षात आलं. बाकीची मुलं पॅलेटमध्ये रंग काढून रंगांच्या अनेक छटा तयार करत होती. राजूची अस्वस्थता बघून दक्षने राजूची रंगपेटी उघडून बघितली आणि त्याला उलगडा झाला. खरंतर "माझे रंग वापर" हे म्हणणं सोपं होतं. पण या गोष्टीचं राजूला ओझं होईल याची दक्षला कल्पना होती. त्याने राजूकडे बघितलं आणि म्हटलं, "राजू, सिल्होट!" राजूचा चेहरा लकाकला! महायुद्धाच्या काळात फक्त अत्यावश्यक वस्तूंचं उत्पादन होत होतं. त्यामुळे रंग तयार होत नव्हते. फक्त चारकोल किंवा काळा रंग वापरून कलाकार सावलीसदृश चित्रं काढत असत. त्यामुळे ही चित्रं फक्त काळ्यापांढऱ्या रंगातच असत. पुढे ही शैली विकसित झाली. इतिहासात शिकलेलं दक्षला एकदम आठवलं.

तास संपत आला. देसाई सर रंगांमधून फिरत होते. सर्व रंगांनी परिपूर्ण पेटी असलेला दक्ष आणि पेटीत फक्त काळा-पांढरा रंग शिल्लक असलेला राजू एकाच तन्मयतेने आणि आनंदाने चित्र काढत होते. सर जवळ येताच "सर, आम्ही सिल्होट शैलीत चित्र काढतोय.." असं दोघांनी सरांना सांगितलं. सरांना मात्र दिसत होतं दोघांच्या मैत्रीचं सप्तरंगी इंद्रधनुष्य!

**-कांचन जोशी**

*kanchanpjoshi76@gmail.com*
*(संस्कृत अभ्यासक)*

# कल्पकला

## बुकमार्क्स

नवीन कपडे खरेदी केल्यावर, बऱ्याच वेळा जाडसर पुठ्ठ्याची लेबल्स (ज्यांना, आपण price tags असंही म्हणतो.) अडकवलेली असतात. ते कपडे घरी आणल्यावर, आपण ते price tags व्यवस्थित ठेवले, तर त्यापासून आपल्याला छान असे बुकमार्क्स बनवता येतील.



**साहित्य-** price tags, ॲक्रेलीक कलर्स, लोकर आणि वॉर्निश.

**कृती-** price tagsच्या दोन्ही बाजूंवर ॲक्रेलीक कलर्सने रंगवून घ्या. रंग वाळल्यावर, त्यावर छानशी नक्षी काढा. थोड्या वेळाने त्यावर वॉर्निश लावा. वॉर्निश सुकल्यावर, फोटोत दाखविल्याप्रमाणे, लोकर ओवून घ्या.

असे हे सहज बनविता येणारे बुकमार्क्स तय्यार! नक्की करून बघा.

**-स्वरूपा वक्नाली**

*swarupamv@gmail.com*

# वासांचा मेमरी बॉक्स


**बरेचदा** आपण बाहेरून घरी येतो आणि गॅसवर काहीतरी खमंग बनतंय याची आपल्याला जाणीव होते. आपलं घ्राणेंद्रिय लगेच जागृत होतं, जिभेला पाणी, पोटात भूक असं सगळं व्हायला लागतं. आपल्या आवडीची गोष्ट असेल तर खाण्याची फारच घाई व्हायला लागते.

काय होत असावं नेमकं? हा छानसा सुगंध आपल्या नाकातून आत शिरतो, नक्की काय होतं?

प्रत्येक गोष्टीला एक खास वास असतो. पदार्थ जिथे बनत असतो, तिथे तापमान-वाढीमुळे छोट्या छोट्या कणांचं बाष्पीभवन होतं आणि तिथून हवेसोबत हे डोळ्यांना न दिसणारे बारीक कण (म्हणजे त्या पदार्थाचे पार्टिकल्स) सगळीकडे

**आपल्याला वासाची जाणीव करून देणारं आपलं इंद्रिय फार हुशार असतं. त्याची स्मरणशक्तीही चांगली असते. एखाद्या गोष्टीचा वास घेतला की तुम्हांलाही काही जुनं आठवतं का? बघा जरा विचार करून!**






चित्रं- देवयानी खरे

पसरू लागतात. बाहेरून आल्या आल्या आपल्याला नव्या वासाची जाणीव होते, कारण घराच्या वातावरणातली हवा आपल्या नाकात जाते. आपण श्वास घेत असताना हे कण नाकातील Mucusकडे (नाकातील चिकट पदार्थ) शोषले जातात आणि त्यांचं एकत्रीकरण होतं.

तुम्हांला गंमत माहितीय? आपल्या नाकात म्हणजे घ्राणेंद्रियात (olfactory receptors) जवळपास हजार प्रकारचे वास शोधून ते ओळखण्याची क्षमता आहे. खरंतर आपल्याला तोंडी कोणी विचारलं तर आपण सांगू शकणार नाही, एवढे प्रकार असतात. आपण ते सांगू किंवा लिहू शकत नाही, कारण आपल्याकडे वासाची ओळख सांगणारे एवढे शब्द आपल्याला माहीत नसतात. पण हजारो प्रकारचे वास ओळखण्याइतकी क्षमता आपल्या शरीराच्या इंद्रियांमध्ये आहे.




जसा वास नाकात शिरतो तसा एक संदेश घ्राणेंद्रियाच्या बल्ब (olfactory bulb) कडे पाठविला जातो. त्याला आपण 'वास ओळखण्याचा विभाग' असं म्हणूया. तिथून ही माहिती आपल्या मेंदूतील घ्राणेंद्रियाच्या मुख्य केंद्राकडे पोहोचवली जाते. मेंदूतल्या मोठाल्या ग्रंथालयात तत्काळ या वासांची नोंद होते आणि त्यापुढे कधीही हा वास आला तर तो ओळखण्याची क्षमता आपल्या मेंदूमध्ये असते.

मग फक्त नाकामार्फतच हा वास आपल्याला कळत असावा का? बरेचदा जेवताना एखादी चव आपल्याला खूप आवडते आणि चव घेतल्या घेतल्या त्या पदार्थाचा वासही आपल्या मेंदूच्या ग्रंथालयात नोंदवला गेलेला असतो. असं कसं होतं?

आपण जेव्हा एखादा पदार्थ खातो तेव्हा त्या पदार्थाचे काही अतिबारीक कण घ्राणेंद्रियाकडे प्रवास करतात. आपल्याला सर्दी झालेली असताना आपल्याला पदार्थांचा वास लगेच कळत नाही. अशावेळी आपली जीभ आपल्याला चवींसह वासाची ओळख करवून द्यायला मदत करते.

हा वासाचा प्रवास आपल्या मनाशी जुळलेला असतो. एखादा सुगंध आला, की आपण लगेच संबंधित गोष्ट आठवायला लागतो. अनेक वासांशी आपल्या आठवणी जुळलेल्या असतात, भावना जुळलेल्या असतात.

अनेक वर्षांनी एखाद्या पदार्थाचा वास आपल्याला आईच्या हातच्या एखाद्या पदार्थाची आठवण करवून देतो. मागे टोकाला रबर असलेल्या पेन-पेन्सिली मिळतात. हे रबर वेगवेगळ्या सुगंधाचे असतात, कधी कधी त्यांना फळांचा, फुलांचा सुगंध येतो. या सुगंधी खोडरबराचीसुद्धा छानशी आठवण तयार होते. माझ्याजवळ लहानपणी एक सफरचंदाच्या आकाराचा मोठ्ठा रबर होता, तर आजही सफरचंदाचा सुगंध घेतला की मला माझ्या शाळेचे दिवस आठवतात. गंधाची स्मरणशक्ती चांगली असते आणि ती दीर्घकाळ लक्षात राहते. तुमचं असं नातं कोणकोणत्या वासांशी जमलंय का?

एखाद्या गोष्टीचा वास घेतला की तुम्हांलाही काही जुनं आठवतं का? बघा जरा विचार करून!


**-देवयानी खरे**

*devyanikhare28@gmail.com*

निसर्ग नवल

**निसर्गाने अनेक जीवांना घर बांधण्याचं कौशल्य जन्मतः दिलेलं आहे. निसर्गातले घटक मोठेपणा मिरवण्यासाठी घरं बांधत नाहीत; उपजत प्रेरणेने, त्यांना पाहिजे त्या कारणासाठी आपापलं घर बांधतात.**








मधमाशांचं पोळं

**माणूस** राहण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीची घरं बांधतो. अगदी आलिशान राजमहालापासून ते लहानशा झोपडीपर्यंत अनेक प्रकारे माणसं स्वतःचा निवारा तयार करतात; किंवा करवून घेतात. मात्र निसर्गातल्या अनेक जीवांकडे हे कौशल्य दिसत नाही. आपण कधी वाघाने बांधलेला राजमहाल किंवा माकडाची झोपडी पाहात नाही.

पण प्रत्यक्षात निसर्गाने अनेक जीवांना घर बांधण्याचं कौशल्य जन्मतः दिलेलं आहे. कोणाला तरी दाखवण्यासाठी किंवा स्वतःचा मोठेपणा मिरवण्यासाठी निसर्गातले घटक घरं बांधत नाहीत, ते उपजत प्रेरणेने, त्यांना पाहिजे त्या कारणासाठी आपापलं घर बांधतात.

कीटकांच्या जगातले असे नावाजलेले वास्तु-कलाकार म्हणजे मुंग्या आणि माशा. मात्र यात एक फरक आहे. समूहाने राहाणारे कीटक- मग त्या मुंग्या असोत की

माशा, या नेहमी समूहाच्या वसाहतीसाठी 'सामूहिक घरं' बांधताना दिसतात. मधमाशांचं पोळं, मुंग्यांचं वारुळ ही याची उदाहरणं म्हणता येतील.

मात्र समूहात न राहाणारे कीटक त्यांच्या अंड्यांच्या आणि पिल्लांच्या संरक्षणासाठी तात्पुरती घरं बांधताना पाहायला मिळतात. कुंभारमाशी ओली माती गोळा करून, आपल्या लाळेत भिजवून गोल गरगरीत मातीच्या मडक्यासारखं घर बांधते. हे मडक्याच्या आकाराचं घर अंडी घालण्यासाठी आणि त्यातून बाहेर आलेल्या पिल्लांना उडता येईपर्यंत संरक्षण मिळावं म्हणून असतं.

मधमाशांचं पोळं म्हणजे त्यांची गजबजलेली वसाहत असते. त्यात अंडी, पिल्लं यांच्यासाठी दालनं असतात. गोळा करून आणलेला मध साठवण्याची जागा असते. राणी माशीचं दालन वेगळं असतं. पोळ्यातील दालनं षट्कोनी आकाराची असतात, कारण त्यामुळे कमीत कमी जागेत जास्तीत जास्त दालनं मावू शकतात, ती उभारायला कमीत कमी साधनसामग्री लागते आणि या आकारामुळेच ही दालनं एकमेकांना घट्ट चिकटून बसतात.

मधमाशांप्रमाणेच समूहाने राहणाऱ्या मुंग्यादेखील त्यांची घरं अतिशय कल्पकतेनं बांधताना पाहायला मिळतात.

रानात फिरताना काही वेळा एखाद्या झाडाच्या खोडावर जरा उंचावर पानांची रचना पाहायला मिळते. पॅगोडा म्हणजे बुद्धमंदिराच्या छपराची आठवण करून देणारी एकावर एक अशी उतरती पानं रचलेली असतात. हे असतं क्रिमॅटोगॅस्टर गटातल्या मुंग्यांचं घरटं. पानाच्या उतरत्या रचनेमुळे पावसाचं पाणी त्यावरून निथळून जातं आणि पानांखालची मुंग्यांची वसाहत सुरक्षित राहाते.

अशीच कल्पकता हार्वेस्टर मुंग्या (शेतकरी मुंग्या) लढवताना पाहायला मिळतात. शेतामधले धान्याचे दाणे गोळा करून सोलून आपल्या जमिनीखालच्या वारुळात ते साठवणाऱ्या हार्वेस्टर मुंग्या या वारुळाच्या वरती मातीची गोलाकार तटबंदी रचतात. पावसाचं वेगानं वाहणारं पाणी या तटबंदीतून फिरायला लागलं की गोल गोल फिरताना आपोआप त्याचा वेग मंदावतो आणि जमिनीखालचं वारुळ उद्ध्वस्त होण्याचा धोका टळतो.

बरेचसे पक्षी मात्र तात्पुरता निवाराच उभारतात. विणीच्या हंगामात अंडी आणि पिल्लांचं संरक्षण व्हावं म्हणूनच पक्षी घरटी तयार करतात. मग त्यामध्ये मातीत बीळ खोदून घरटं थाटणाऱ्या खंड्यापासून ते पानं शिवून नाजूकसं लटकतं घरटं तयार करणाऱ्या शिंपी पक्ष्यांपर्यंत सगळेच पक्षी येतात. कलाकौशल्याच्या बाबतीत सुगरण म्हणजे बाया पक्ष्याचं नाव सगळ्यात वर! गवताची लांब लांब पाती आणून त्याचं अतिशय देखणं, सुरक्षित, आकर्षक घरटं विणणाऱ्या सुगरण पक्ष्याचा खोपा


हार्वेस्टर मुंग्यांचं वारुळ

म्हणजे जणू पक्षीजगतातील घराचा सर्वांत उत्कृष्ट नमुनाच. मात्र हे घरटं विणण्याचं कौशल्य सुगरण पक्ष्यांच्या नरालाच अवगत असतं, माद्यांना नाही.

आपल्या भारतातील सुगरण पक्ष्यांचे आफ्रिकेत सापडणारे भाईबंद म्हणजे 'सोशिएबल व्हिवर बर्ड '. हे पक्षी समूहाने राहातात आणि आपली भलीमोठी कॉलनी थाटून पिढ्यान्-पिढ्या एकाच मोठ्या घरट्यात सुखाने नांदतात. दुरून पाहिलं तर यांचं घरटं म्हणजे झाडावर रचलेली गवताची गंजी वाटते. पण त्या अस्ताव्यस्त दिसणाऱ्या गवताच्या ढिगाऱ्यातही रचना असते. वरून नुसतं गवत रचलेलं वाटलं, तरी आतमध्ये प्रत्येक जोडीचं स्वतंत्र दालन असतं. ही वसाहत कायमस्वरूपी असते. काहीवेळा तर पन्नासपेक्षा जास्त वर्षं वापरात असलेली वसाहत निसर्ग-अभ्यासकांना पाहायला मिळाली आहे.



सोशिएबल व्हिवररचे घरटे

एक मजेदार घरटं असतं न्यू गिनिआतील 'वोगेल्कोप गार्डनर बोवर बर्ड' या पक्ष्याचं. हा पक्षी ज्या कुळातला आहे, त्यातले बहुतेक सगळेच पक्षी जमिनीवर एखादा लताकुंज (बोवर) असावा, असं आपलं घरटं उभारतात. या गार्डनर बोवर पक्ष्याचं घरटं म्हणजे काड्यांनी उभारलेला लहानसा मंडप असतो. या त्रिकोणी घरट्याची उंची साधारण १०० सें.मी.असते आणि परीघ १६० सें.मी. शिवाय या घरट्याच्या समोर एखादं उद्यान बनवावं, तसं हा पक्षी वाळलेली पानं, रानातली फळं, आकर्षक फुलं मांडून ठेवतो. आपल्याच घरट्यासमोरची ही 'रांगोळी' सर्वात उठून दिसावी म्हणून नर बोवर बर्ड कायम तत्पर असतात. जुन्या झालेल्या गोष्टी काढून नव्या नव्या गोष्टी आणून ते घर सजवताना दिसतात. कारण याच सजावटीवर खूश होऊन त्यांना जोडीदार मिळणार असतो. माद्या येऊन सगळ्या नरांनी आपापल्या घरासमोर केलेली सजावट बघतात आणि जी आवडते, त्या नराला जोडीदार म्हणून निवडतात.



बोवर बर्डचे घरटे

निसर्गातील रचनकारांच्या रचना या त्यांच्या नैसर्गिक प्रेरणेतून निर्माण झालेल्या असतात. त्या शिकण्यासाठी त्यांना कुणाकडे शिकवणी लावावी लागत नाही. मात्र उपयुक्तता आणि सौंदर्य याचा प्रसन्न मिलाफ त्यांच्यात पाहायला मिळतो.

**-मकरंद जोशी**
*makarandvj@gmail.com*
*(निसर्ग अभ्यासक व लेखक)*

*(लेखातील फोटो युवराज गुर्जर, मकरंद जोशी आणि इंटरनेटवरून साभार )*


त्यांनाही वाटत असेल!
टेबलालाही वाटत असेल
खुर्चीवरती बसावं...;
खिडकीलाही वाटत असेल
दरवाजाशी बोलावं...!
पाण्यालाही वाटत असेल
अंघोळ करून यावं...;
आरशाला वाटत असेल
कसा दिसतो पहावं...!
पुस्तकाला वाटत असेल
वाचणाऱ्याला वाचावं....;
शाळेलाही वाटत असेल
आपलं घर पहावं....!
बोलता येत नाही म्हणून
त्यांनी किती कुढावं?
बोलणाऱ्याने कधीतरी
त्यांचं मन जाणावं!
कवी / प्रवीण रवणे ■ सुलेखन / अच्युत पालव



## असं का होतं?

**चारचौघांत जांभई आली की ओशाळं वाटतं ना? काही वेळा शिक्षकांचा ओरडाही मिळतो त्यामुळे. पण काय करणार, टाळताही येत नाही जांभई!**

**वर्गात** पहिल्या बाकावर बसलेल्या स्कॉलर सान्वीला जांभई अनावर झाली. तिला फारच ओशाळं वाटलं, पण बाई हसल्या आणि म्हणाल्या, “आता तुला तरतरी येईल आणि डोकं मस्त चालेल बघ!”

अनेक देशांत, अनेक संस्कृतींमध्ये अगदी पूर्वीपासूनच जांभई हे झोपेचं, निरुत्साहाचं, कंटाळ्याचं लक्षण समजलं जातं. चारचौघांत, मोठ्यांसमोर जांभई द्यायची नसते. तरीही ती येतेच. पोटातल्या बाळाला तीन महिन्यांपासून जांभई येते. पाली-सरडे, मासे, पक्षी, वाघ-सिंह असे सगळे, पाठीचा कणा असलेले प्राणी जांभई देतात. पण ते जांभई का देतात ते मात्र गूढच आहे.

ताप आला किंवा भोवतालचं तापमान वाढलं, की जांभया येतात. भांड्यातलं पाणी तापलं की वाफ बाहेर टाकायला झाकण उघडलं जातं. जांभईदेखील तशीच शरीरातली तापलेली हवा बाहेर टाकायला येत असावी, असा अडीच हजार वर्षांपूर्वीच्या लोकांचा कयास होता. मेंदूतल्या ऑक्सिजनचं प्रमाण वाढवण्यासाठी जांभई येत असावी अशीही अटकळ होती. पण अलीकडच्या निरीक्षणात असं आढळलं की, भोवतालच्या हवेत ऑक्सिजनचं प्रमाण १००% असलं तरी जांभयांचं प्रमाण कमी झालं नाही; म्हणजे मेंदूला अधिक ऑक्सिजन पोचवणं हा जांभईचा हेतू नसावा.

अर्धशिशी किंवा आकडी, मेंदूचे इतर काही आजार यांमुळे दिवसाला २७-२८ वेळांहून अधिक जांभया येतात. फारच जबडा ताणून जांभई दिली तर जबड्याचा सांधा सटकतो, तर कधी तिथल्या मज्जातंतूंनाही दुखापत होऊ शकते. पण अन्यथा जांभई बहुगुणी असते.



# जांभई

जांभईच्या अलीकडच्या सखोल अभ्यासाला ‘कॅझ्मॉलॉजी’ म्हणजे ‘दरीचा, खाईचा अभ्यास’ म्हणतात! पेंगुळलेल्या मेंदूमध्ये अनेक झोपाळू रसायनं जमा होतात. त्यामुळे मेंदूच्या वेगवेगळ्या भागांकडून एकजुटीने उपाययोजना आखली जाते. मग जबडा ताणून, नाकातोंडावाटे मोठ्ठा प्रदीर्घ श्वास आत ओढून मग निःश्वासावाटे हवा बाहेर टाकली जाते. त्याच्यात श्वासपटल (diaphragm), छातीचे-घशाचे-टाळूचे आणि इतरही स्नायू भाग घेतात. मान, हात, पाठ ह्यांनाही नकळत ताण दिला जातो. नेहमीच्या श्वासाहून बरीच अधिक हवा फुप्फुसांत ओढली जाते. तिच्यामुळे आतलं तापमान संतुलित होतं. मेंदूचा रक्तपुरवठा वाढतो आणि तिथलं तापमान घटतं. मेंदू हा एक संगणकच आहे. त्यामुळे तो कमी तापमानाला अधिक जोमाने काम करतो.

दुसऱ्याची पाहून आपल्यालाही जांभई येते. असं का?



जांभई फक्त आपल्यालाच येते, की प्राण्यांनाही येते?

शिवाय जांभईने मेंदूभोवतालच्या पाण्याचा चांगला निचरा होतो. मेंदूतले झोप आणणारे पदार्थ हाकलून तिथे जाग आणि तरतरी आणणाऱ्या हॉर्मोन्सचं प्रमाण वाढतं. कॉफी प्यायल्यावरही ते तसंच वाढतं. हे सगळं पाच-दहा सेकंदांत घडतं. मग नव्या युक्त्या, कल्पना सुचायला लागतात.

पॅराशूटमधून उडी मारण्यापूर्वी सैनिकांना जांभई येते! ऑलिम्पिक खेळाडूंना स्पर्धेपूर्वी आणि वादकांना कार्यक्रम सुरू होता होता जांभया येतात! मोठ्या श्रमांनी सावज पकडल्यावर त्याच्यावर ताव मारण्यापूर्वी वाघ-सिंह जांभई देतात आणि ताजेतवाने होऊन पुख्खा झोडतात. सकाळी उठल्याबरोबर येणाऱ्या जांभया तशीच तरतरी आणतात. सान्वीच्या बाईंना तेच म्हणायचं होतं.

जांभईने आणखीही एक काम केलं. बाईंचं शिकवणं जरा कंटाळवाणं होत होतं. सान्वी तसं शब्दांत सांगू शकली नसती. पण तिला जांभई आल्याबरोबर आजूबाजूच्या मुलांनाही सह-अनुभूतीने जांभया आल्या. त्या देहबोलीतून संदेश बाईंपर्यंत पोचला. बाईंनी वाचन थांबवून प्रश्नोत्तरं सुरू केली.

आपल्या मेंदूत काही आरसे-पेशी (मिरर न्यूरॉन्स) असतात. त्या पेशी तशा सह-अनुभूतीला हातभार लावतात. दुसऱ्याला काम करताना बघून आपण शिकणं हीदेखील त्याच आरसे-पेशींची करामत. म्हणजे दुसऱ्याची पाहून जांभई येणं हे शिकाऊपणाचं लक्षण आहे. छिन्नमती (स्किझोफ्रेनिक) लोकांत आणि स्वमग्न (ऑटिस्टिक) मुलांत आरसे-पेशींची कमतरता असते. त्यांना दुसऱ्याची पाहून जांभई येत नाही.

एकाच्या जांभईमुळे जांभयांची साथ येणं चिंपांझी, कुत्रे, लांडगे वगैरे प्राण्यांतही सर्रास दिसतं. ते आपुलकीचं लक्षणसुद्धा आहे. परक्या चिंपांझीपेक्षा ओळखीच्या चिंपांझींच्या जांभयांचं अनुकरण अधिक होतं. कुत्र्याच्या मालकाला जांभई आली तर कुत्र्यालाही ती येते. पण अनोळखी माणसाच्या जांभईने कुत्र्याच्या आरसे-



पेशी जाग्या होत नाहीत. सिंहांच्या कळपातल्या एका सिंहाने जांभई दिली की इतर सिंह जांभई तर देतातच, पण त्यानंतर तो पहिली जांभईवाला जे-जे काही करेल त्या सगळ्याचं अनुकरण बाकीचे करतात. कळपातल्या एकाच्या जांभईचं अनेकांनी अनुकरण केलं की, पेंगुळलेले सगळेजण सजग होऊन संकटाशी झुंजायला सुसज्ज होतात. काही प्राण्यांत प्रेमाची जांभई वेगळी, हुकमतीची वेगळी आणि झुंजीचं आव्हान द्यायची आणखी तिसरीच... अशा तऱ्हातऱ्हा असतात. पालीसरड्यांपासून मानवापर्यंतच्या उत्क्रांतीत जांभई टिकून राहिली ती तशा सगळ्या उपयोगांमुळेच!

आणि हो, पुढच्यावेळी रोलर-कोस्टरवर किंवा विमानात कानात दडे बसले की मोठ्ठी जांभई द्या. जबडा ताणताना कानाच्या पडद्याचे स्नायूसुद्धा ताऽऽऽऽणऽऽले जातील. दडा सुटेल. तेव्हा या लेखाची आठवण काढा बरं!

**-डॉ. उज्ज्वला दळवी**
*ujjwalahd9@gmail.com*
*(वैद्यकतज्ज्ञ व नामवंत साहित्यिक)*

# शब्दखेळ

माणसाच्या भाषेवरून माणूस कळतो असं आपण म्हणतोच! जेव्हा जग फार जोडलं गेलं नव्हतं आणि त्या वेळी घर, वाडी, गाव हेच विश्व होतं, त्या काळात भाषा खूपच मृदू आणि सकारात्मक होती. त्या भाषेतही सौंदर्य जाणवायचं. त्याची कारणं काय असतील, याचा आता आपण विचार करणार नाही. आपल्या आई-आजीच्या तोंडी असे शब्दप्रयोग तुम्ही नक्कीच ऐकले असणार! आज आपण ते शब्दप्रयोग आठवून भाषेची मजा लुटू या. ही यादी मोठ्ठी करू या.

- अनारसे हसले / फसले- (बिघडले)
- बांगडी वाढवली-(फुटली)
- पैसे पुढे केले- (दिले, मदत केली)
- दिवे तेवले- (लागले, पेटले)
- भांडी उजळली- (घासली)
- पानं मांडली- (जेवणाची पूर्वतयारी)
- गजरा माळला- (घातला)

**-कांचन जोशी**
*kanchanpjoshi76@gmail.com*
*(संस्कृत अभ्यासक)*

# एकदा ढगांनी घेतली सुट्टी

बास झालं आता काम
करून घेऊ थोडा आराम
वेड्यासारखं वाहायचं..
धो धो पडायचं..
वीजबाईचं कडाडून
बोलणं ऐकायचं

कुणी सांगितलं इतकं?
ते काही नाही..
आता मस्त सुटी घ्यायची,
कडक उन्हात झोप काढायची..

डोंगराजवळ फिरकायचं नाही
गार वाऱ्याशी बोलायचं नाही..
ठरवून ढगांनी मग घेतली सुट्टी
वाऱ्याशीही घेतली कट्टी...

पांढरेशुभ्र ढग करू लागले आराम
थेंबांचा मग पडला बंद कारभार
दिवस सरले...महिने सरले..
ढग काही उठेनात
पाऊस काही पाडेनात...

मोराने आधी केली तक्रार
नाच माझा कसा रंगणार ?
असं काही चालणार नाही...
ढगांना कामावर यावंच लागेल...
रंग आपला टाकावा लागेल
काळंकुट्ट व्हावं लागेल..

पाऊस कधी पडणार आहे?
वाट पाहून थकले सारे...

सूर्याची मग घेतली मदत
समुद्राचं पाणी बाबा चांगलंच तापव
चटके चांगले बसल्यावर,
अंग जरा भाजल्यावर,
ढग गुपचूप बसतील मग
डोंगराच्या मांडीवर...

वाऱ्याशी बोलतील...
दंगा करतील..
राग विसरतील..
धिंगाणा घालतील ...

गार गार वारा
गाईल मग गाणी...
ढगांमधून बरसेल
पाणीच पाणी...
ढगांची एकदाची मग संपली सुट्टी...

इवल्या इवल्या अंगणात
मोराच्या पिसात,
काळ्याभोर शेतात
पाऊसगाणी फार फार रंगली...

-वैशाली सूर्यवंशी
*vaishalisuryavanshi30@gmail.com*
*(शिक्षिका, जि. प. प्राथमिक शाळा, खालपफाटा, ता. देवळा, जि. नाशिक)*

अहम् आवाम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
# वयम्
'वयम्' न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७० इमेल : info@wayam.in वेबसाइट : www.wayam.in

**वाचकांमध्ये 'वयम्'ची लोकप्रियता वाढत आहे. 'वयम्'चे सभासदत्व घेण्यास उत्सुक असलेल्यांच्या सोयीसाठी आमच्या प्रतिनिधींची ही यादी. हे 'वयम्' प्रतिनिधी म्हणजे 'वयम्'चा प्रसार प्रेमाने करणारे दूत आहेत.**

## 'वयम्' प्रतिनिधी

**पुणे (पिंपरी-चिंचवड)**
सुप्रिया पुराणिक
7030360758

**गोरेगाव-मुंबई**
अनघा अनिल चंद्रात्रे
8080550353

**पालघर**
मनोविकास ग्रंथोत्सव
9967081527

**गिरगाव-मुंबई**
मेसर्स बी.डी.बागवे एजन्सी
7506000869

**वरळी-मुंबई**
संजना चव्हाण
9221969336

**डोंबिवली**
सुनिल पांचाळ
9930016920

**कल्याण**
डॉ. योगेश जोशी
9757077614

**कल्याण**
विकास वाचनालय (DSK)
9819931421

**बदलापूर**
नेत्रा नरवणे
9604677297

**अलिबाग**
श्रुती संतोष बोंद्रे
9423381129

**रत्नागिरी**
गार्गी केदार देवस्थळी
9404331020

**कणकवली-मालवण**
सुषमा केणी
9284035326

**वेंगुर्ला-सिंधुदुर्ग**
मधुरा नित्यानंद आठलेकर
9405925454

**उदगीर**
नितीन दुरुगकर
9579018581

**कराड**
संजय पुजारी (**डॉ.कल्पना चावला विज्ञान केंद्र**)
9226163260

**नांदेड**
शिवाजी आंबुलगेकर
9423440598

**लातूर**
ज्ञानप्रकाश बालविकास केंद्र
9421693089

**लातूर**
वैद्य जयश्री कुलकर्णी
9326190749

**बुलढाणा**
मैत्री नरेंद्र लांजेवार
7666407475

**कोल्हापूर**
डॉ. धनश्री खाडे
9604636893

**अकोला**
उत्कर्ष जैन
9850263103

***SWS* फायनान्शिअल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड**

**नाशिक**
रुपाली कुलकर्णी
9011896681

**मुंबई**
किशोर काळे
9869239940

ऑनलाइन इंग्रजी बोलायला शिकण्याची
THE KINGS' English Academy
'वयम्'च्या वाचकांसाठी सुवर्णसंधी. केवळ 2000/- रुपये भरा आणि एक महिना ऑनलाइन क्लास आणि दोन वर्षांसाठी 'वयम्'चे सभासदत्व मिळवा. **विद्यार्थी, शिक्षक, महिलांसाठी स्वतंत्र बॅच.**
**संपर्क- प्रा. श्रुती राजे**
8421113111
9822240106

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

अहम् आवाम्
वयम्
आपण सारे

न्यू वंदना को. ऑप. हाऊसिंग सोसायटी, ३रा मजला,
लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे ४०० ६०२
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
'वयम्' मोबाइल : ९१३७१२८९१५
इमेल : info@wayam.in
वेबसाइट : www.wayam.in



# सभासद नोंदणी फॉर्म

**१ वर्ष**
**₹ ११००/-**
डिलिव्हरी चार्जेससहित

**१० + १ दिवाळी अंक**

scan here to pay

नोंदणी क्रमांक : ........................ दिनांक : ........................

नाव : ........................

पत्ता : ........................

........................ पिन कोड : ........................

जवळची खूण : ........................

फोन : ........................ इमेल : ........................

जन्मतारीख : ........................ इयत्ता : ........................

शाळा : ........................

वर्गणी जमा केल्याचा तपशील

चेक नं. : ........................ बँक व बँक शाखा : ........................

चेक दिनांक : ........................ रुपये : ........................

'वयम्'च्या ऑनलाइन सबस्क्रिप्शनसाठी माहिती-

Labindia Analytical Instruments Pvt. Ltd. Axis Bank, Thane | CC A/C No.: 911030017556004 | IFSC : UTIB0000061

चेक / डिमांड ड्राफ्ट : लॅबइंडिया ॲनॅलिटीकल इन्स्ट्रुमेंटस प्रा.लि.
(Labindia Analytical Instruments Pvt. Ltd.) या नावाने काढावा. सही : ........................

*'वयम्' मासिकाचे वर्गणीदार झाल्याबद्दल धन्यवाद!*

RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2020-22 Post at Mumbai Patrika Channel Sorting Office G.P.O. Mumbai 400 001
Published on 1st of every month and posted on 5th of every month

